दैनिक अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

www.rashtrasahyadri.com

* संपादक : काकासाहेब नवले * RNI No. MAHMAR/2019/82605 * वर्ष ७ वे * पाने ८ * मुल्य रू. ४.००
* अंक ११४ * सोमवार २ फेब्रुवारी २०२६ * पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282

### भ्रमनिरास करणारा अर्थसंकल्प



**संगमनेर :** मोदी सरकारने आज सादर केलेला अर्थसंकल्प हा देशासमोरील आर्थिक व सामाजिक संकटांवर उपाय करण्याऐवजी प्रश्न अधिक गंभीर करणार आहे या अर्थसंकल्पात गरिबांसाठी कोणताही दिलासा नसून महागाई व बेरोजगारी आटोक्यात आणण्यासाठी ठोस उपाययोजना नाही. अर्थसंकल्प पूर्णपणे अपयशी असून भ्रमनिरास करणारा आहे. देशामध्ये म हागाई, बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र हे नियंत्रणात आणण्यासाठी सरकारकडून कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या गेल्या नाही रोजगार वाढवण्यासाठी कोणताही विचार दिसत नाही. वाढत्या कर्जबोजाकडे आणि रुपयाच्या घसरनीकडेही सरकारने दुर्लक्ष केले आहे.

**– माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात**
काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य

### उत्तर महाराष्ट्राचा अपेक्षाभंग



**नाशिक :** पुणे रेल्वे बाबत संगमनेर तालुक्यासह उत्तर महाराष्ट्रातील जनतेला मोठी अपेक्षा होती मात्र यामध्ये या हाय स्पीड रेल्वेला पूर्णपणे दुर्लक्षित केले गेल्याने सर्व नागरिकांचा भ्रमनिरास झाला आहे.

उत्तर महाराष्ट्रासाठी कोणत्याही ठोस उपाययोजना या अर्थसंकल्पात नसून रोजगारासाठी व शेतकऱ्यांसाठी कोणत्याही विशेष योजना राबवले नसल्याची टीका करताना देशाच अर्थव्यवस्थेची स्थिती ही फक्त आकडेवारीतून दाखविली जाते व काय असा प्रश्न त्यांनी उपस्थित करताना नाशिक – पुणे रेल्वे हामार्ग साठी कोणताही निधी व तरतूद नसल्याने अपेक्षा भंग झाल

**– आ. सत्यजित तां**

# नव्या आर्थिक वर्षात नवा आयकर कायदा

## अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची केंद्रीय अर्थसंकल्पात घोषणा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण रविवारी, १ फेब्रुवारी २०२६ रोजी सलग नवव्यांदा पूर्णवेळ अर्थसंकल्प सादर करत इतिहास रचला. इतिहासात दुसऱ्यांदा रविवारी अर्थसंकल्प सादर करण्यात आला. विकसित भारतासाठी आम्ही वेगवेगळ्या संकल्पना राबवल्या, भारतीय अर्थव्यवस्था बळकट केली. सरकारच्या या धोरणांना लोकांनीही पाठिंबा दिला. येत्या काळात आमची सुधारणा एक्सप्रेस ही वेगाने धावेल यात शंका नाही असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या. नवीन आयकर कायदा १ एप्रिल २०२६ पासून लागू होईल.**

वित्तीय तूट जीडीपीच्या ४.४% राहील असे सांगताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी करांद्वारे २८ लाख कोटींचे उत्पन्न अपेक्षित असल्याचे म्हटले. नव्या कर धोरणात अपघात विमा करमुक्त करण्यात आल्याने अपघात विम्यातून मिळालेली रक्कम करमुक्त असणार आहे.

एक एप्रिल पासून नवीन आयकर कायदा लागू करण्यात येणार असून आयकर परतावा भरण्यासाठी ३१ जुलै पर्यंत मुदत असेल. शिवाय अघोषित संपत्तीची मर्यादा एक कोटीपर्यंत वाढवली आहे.

अघोषित संपत्तीवर दंड ऐवजी कर भरण्याची तरतूद करताना छोट्या कर चुकवेगिरीबद्दल शिक्षा नाही, दंड आकारला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, क्लाऊड सर्विस देणाऱ्या परदेशी कंपन्यांना २०४७ पर्यंत करमुक्ती देण्याचा निर्णय घेण्यात आला. भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे आणि पुढील दोन वर्षांत तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं वेगानं वाटचाल करत असताना सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पाला विशेष महत्त्व आहे.

२०४७ पर्यंत 'विकसित भारत' होण्याचं ध्येय साध्य करण्यासाठी, उच्च अमेरिकन शुल्क आणि जागतिक आव्हानांमध्ये, देशाला ८ टक्के सातत्यपूर्ण जीडीपी विकास दर राखावा लागेल. भारत सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे, हा वेग वाढवण्यासाठी अर्थसंकल्पात विशेष तरतुदी करण्यात आल्याचे दिसून येते.

### आर्थिक विकासाला ६ क्षेत्रांवर लक्ष केंद्रित

- धोरणात्मक आणि आघाडीच्या क्षेत्रांमध्ये उत्पादन क्षेत्राला वेग देणे.
- चॅम्पियन एमएसएमइ उभारणे.
- वारसाहक्काने असलेल्या औद्योगिक क्षेत्रांचे पुनरुज्जीवन.
- पायाभूत सुविधांना मजबूत चालना देणे.
- दीर्घकालीन सुरक्षा आणि स्थिरता सुनिश्चित करणे.
- शहरांमध्ये आर्थिक क्षेत्रांचा विकास करणे.




### काय होणार स्वस्त, काय महाग..?

**केंद्रीय अर्थसंकल्पानुसार, सीमाशुल्क कपात, कर सवलती आणि इतर धोरणांमुळे काही वस्तू आणि सेवांवर परिणाम होणार आहे. सामान्य नागरिकांच्या दृष्टीने मुख्य बदल खालीलप्रमाणे आहेत.**

#### स्वस्त होणार

* कर्करोग आणि जीवनरक्षक औषधे
* खेळांचे साहित्य
* चामड्याच्या वस्तू आणि पादत्राणे
* मायक्रोवेव्ह ओव्हन
* सोलर पॅनेल
* ईव्ही बॅटरी आणि कॉम्पोनेंट्स
* स्मार्टफोन
* परदेशी पर्यटन
* परदेशातील शिक्षण आणि वैद्यकीय उपचार
* सीफूड, समुद्री उत्पादने
* वैयक्तिक वापराच्या आयात वस्तू

#### महाग होणार

* दारू, सिगारेट, बिडी, पान मसाला आणि गुटखा
* अल्कोहोल
* व्हिडिओ गेम्स
* कॉफी मशिन्स
* इम्पोर्टेड कॅमेरा आणि फिल्म-मेकिंग उपकरणे
* लोखंड, कोळसा, मीठ अशी खनिजे
* फ्युचर्स आणि ऑप्शन्स ट्रेडिंग




### अर्थसंकल्पातील महत्त्वाच्या घोषणा

- सेमी कंडक्टरसाठी ४० हजार कोटी
- भारताला औषध निर्मितीचे हब बनवू,
- बायोफार्मासाठी १०,००० कोटींची तरतूद
- शुगर आणि कॅन्सरचे औषधोपचार स्वस्त
- ७ हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर
- मुंबई- पुणे आणि पुणे-हैदराबाद नवे रेल्वे कॉरिडॉर
- २० नवे जलमार्ग बनवणार
- बॅंकिंग क्षेत्राच्या विकासासाठी नवी समिती
- सेमीकंडक्टर क्षेत्रासाठी ४० हजार कोटींची तरतूद
- देशात तीन मोठ्या केमिकल पार्कची उभारणी करणार

### शेतकऱ्यांसाठी तरतूद

१) कापूस उत्पादनासाठी नवीन योजना राबवणार.
२) मत्स्य उद्योगाला चालना देणार.
३) पशुपालन उद्योगाला चालना देणार.
४) मत्स्य पालनासाठी ५०० अमृत जलाशय तयार केले जाणार.
५) नारळ ,चंदन, काजूचे उत्पादन वाढवले जाणार.
६) भारताच्या काजू कोकोला जागतिक ब्रॅंड बनवणार.
७) शेतकऱ्यांसाठी बहुभाषिक एआय टूल तयार करणार

### दारू सिगारेट महागली, बिडी मात्र स्वस्त

अर्थसंकल्पातील कर बदलाच्या घोषणेमुळे दारू, सिगारेटही महाग झाली आहे. तर बिडी स्वस्त झाल्या आहेत. देशात मद्यपान करणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे. त्यामुळे वाढत्या अल्कोहोलच्या किमतींचा थेट परिणाम लोकांच्या खिशावर होईल. ज्यामुळे त्यांना त्यांच्या आवडत्या मद्यावर अधिक खर्च करावा लागेल. आजपासून, वाढत्या कर आणि उत्पादन शुल्कामुळे सिगारेट आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या किमती वाढल्या आहेत. नवीन नियमांनुसार, सिगारेटवरील प्रति-स्टिक शुल्कासह ४०% जीएसटीमध्ये अतिरिक्त उपकर आणि उत्पादन शुल्क जोडले गेले आहे. अल्कोहो स्क्रॅप आणि खनिजांच्या विक्रीवरील कर गोळा केलेल्या स्त्रोतावर द २% पर्यंत वाढवला आहे. जो पूर्वी १% होता.

# केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राचा एक लाख कोटींचा वाटा

## ९८ हजार कोटींचे कर उत्पन्न, १२ हजार कोटी विविध प्रकल्पांसाठी मिळणार




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मांडलेला अर्थसंकल्प हा विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे. केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा हा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता, १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे १ लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

केंद्रीय अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना माध्यमांशी ते बोलत होते.शहरीकरणाला नियोजनबद्ध करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे.

शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी **(पान ४ वर)**

### महाराष्ट्रासाठीच्या तरतुदी

* महाराष्ट्र ग्रामीण रस्ते प्रकल्प : ३७८.३८ कोटी
* महाराष्ट्र अॅग्रीबिझनेस प्रकल्प : १६७.२८ कोटी
* सर्वसमावेशक विकासासाठी इकॉनॉमिक क्लस्टर : २८३.७७ कोटी
* महाराष्ट्र टर्शरी केअर आणि वैद्यकीय शिक्षण विकास कार्यक्रम : ३८५.७८ कोटी
* उपसा सिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण : २०७.१० कोटी
* शेती आणि ग्रामीण परिवर्तन प्रकल्प : ६४६.२४ कोटी
* मानवी विकासासाठी कौशल्य आणि अप्लाईड नॉलेज प्रकल्प : ३१३.६५ कोटी
* जिल्ह्यांमध्ये संस्थात्मक संरचना क्षमतावृद्धीसाठी : २४०.९० कोटी
* मुंबई-अहमदाबाद हायस्पीड कॉरिडॉर : ६१०३ कोटी
* मुंबई मेट्रो : १७०२ कोटी
* एमयुटीपी ३ : ४६२ कोटी
* एमएमआरमध्ये ग्रीन मोबिलिटी : १५५.३२ कोटी
* समृद्धी महामार्गावर आयटीएस : ६८०.७९ कोटी
* पुणे मेट्रो : ५१७.७४ कोटी

**एकूण : १२,३५५ कोटींचे प्रकल्प**



### सोने-चांदीचे दर गडगडले

एकीकडे ऑप्शन ट्रेडिंग वरील करवाढीमुळे शेअर बाजार कोसळलेला असतानाच, दुसरीकडे सोने आणि चांदीच्या किमतीतही ऐतिहासिक घसरण नोंदवण्यात आली आहे. जागतिक घडामोडी आणि बजेटमधील आर्थिक धोरणांचा परिणाम थेट कमोडिटी मार्केटवर झाला असून मौल्यवान धातूंचे दर कमालीचे खाली आले आहेत. या घसरणीमुळे ग्राहकांसाठी स्वस्तात दागिने खरेदीची सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर चांदीच्या दरात तब्बल ९ टक्क्यांची मोठी घसरण झाली. चांदीचा भाव आता २,६५,६५२ रुपये प्रति किलो वर आला आहे. विशेष म्हणजे, एकाच दिवसात चांदीच्या भावात १७,५१२ रुपयांची कपात झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, चांदीमध्ये झालेली ही घसरण सर्वात मोठी आणि महत्त्वपूर्ण घसरण मानली जात आहे. सोन्याच्या दरातही मोठी पडझड पाहायला मिळाली. सोन्याचा भाव ३.०५ टक्क्यांनी घसरून १,४६,९०० रुपये प्रति १० ग्रॅम वर पोहोचला आहे. सकाळी बाजार उघडताच सोन्याच्या भावात ७६४९ रुपयांची घसरण झाली होती. गेल्या शुक्रवारी सोन्याचा दर १,५०,८४९ रुपयांवर होता, तर चांदीचा दर २,९१,९२२ रुपये प्रति किलोग्रॅमवर पोहोचला होता. (पान ४ वर

# शेतकऱ्याचे भाऊबंदाकडूनच अपहरण करून अमानुष अत्याचार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** आमची माती आमची माणसं असं म्हणत ग्रामीण भागात कुटुंब आणि शेजारपाजारच्या बंधनात जीवन व्यतीत करणाऱ्या सामान्य शेतकऱ्याच्या आयुष्यात विश्वासघाताची काळी छाया कशी पसरू शकते, याची एक विदारक कथा लोणी व्यंकनाथ गावात उघड झाली. ४८ वर्षीय शेतकरी बापू लहानू कोकरे यांना त्यांच्या स्वतःच्या भाऊबंदांकडून अपहरण, मारहाण, अनैसर्गिक अत्याचार आणि जीवे मारण्याचा प्रयत्न झाला. ही घटना केवळ एक गुन्हा नाही, तर ग्रामीण भारतातील कुटुंबातील फूट, संशय आणि न्यायव्यवस्थेच्या कमकुवतपणाचे कटू वास्तव उघड करते.

या प्रकरणात आरोपींमध्ये दादा, बिरू, शिवाजी कोकरे, भागोजी उर्फ आण्णा कोळपे, कोंडीबा आणि राहुल कोळपे यांच्यासह दोन अज्ञात

**■ २० जानेवारी २०२६ रोजी रात्री साडेआठच्या सुमारास बापू कोकरे हे गट क्रमांक ११२ मधील उसाच्या शेतात पाणी देत असताना त्यांच्यावर हल्ला झाला. तू पोलिसांना माहिती दिलीस असा संशय घेऊन आरोपींनी प्रथम शिवीगाळ आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. नंतर तोंडात कापड कोंबून अपहरण करून त्यांना बाबुर्डी गावाच्या निर्जन शिवारात नेले. तिथे किळसवाण्या अनैसर्गिक अत्याचारासोबतच पाठीवर सिगारेटचे चटके देण्यात आले. इतक्यावरच न थांबता स्कॉर्पिओ (एमएच१२ एलपी १५३५) आणि बोलेरो (एमएस१६ सीवाय ९८२१) या वाहनांतून अज्ञात ठिकाणी नेले आणि रेल्वे लाईनवर चाकू लावून जीव घेण्याचा प्रयत्न केला. प्रसंगावधान राखून बापू यांनी जीव वाचवला, पण ते गंभीर जखमी झाले आहेत.**

व्यक्तींचा समावेश आहे. श्रीगोंदा पोलिस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम १४०(४), १८९(२), १९१(२)(३), १९०, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. मात्र, इतका गंभीर गुन्हा होऊनही अद्याप एकाही आरोपीला अटक झालेली नाही. यामुळे परिसरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. शेतकरी न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत, पण आरोपी मोकाट फिरत आहेत. ग्रामीण भागात कायद्याचा धाक उरलाय की नाही? असा सवाल स्थानिक शेतकरी संघटनेचे नेते राम दास पाटील यांनी उपस्थित केला.

बापू कोकरे यांच्या कुटुंबाची कहाणी ग्रामीण जीवनातील संघर्षाची जिवंत प्रतिमा आहे. ते एक सामान्य शेतकरी, ज्यांचे आयुष्य शेती आणि कुटुंबावर अवलंबून आहे. मला माझ्याच रक्ताच्या लोकांनी मातकळ्यात गाडण्याचा प्रयत्न केला. मी फक्त न्य मागतो, असे बापू यांनी रुग्णालया सांगितले. ही घटना ग्रामीण भागात वाढत्या संशय, जमिनीचे वाद आ कायद्याच्या अंमलबजावणीत त्रुटींवर प्रकाश टाकते. अनेक अशा प्रकरणांत सामाजिक दबावामु न्याय मिळत नाही, आणि पीडि एकटे पडतात.या घटनेने श्रीगो तालुक्यातील नागरिकांना विच करायला भाग पाडले आहे.

## संपादकीय

# आर्थिक शिस्त आणि अपेक्षांचे संतुलन

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी संसदेत केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. हा त्यांचा नववा अर्थसंकल्प असून, तो 'कर्तव्य भवन'मध्ये तयार करण्यात आला आहे. जागतिक आर्थिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव आणि देशांतर्गत आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा अर्थसंकल्प सादर झाला. भारतीय नागरिकांकडून या अर्थसंकल्पाकडून मोठ्या अपेक्षा होत्या, विशेषतः मध्यमवर्गीय करदात्यांना कर सवलती, रोजगार निर्मिती आणि महागाई नियंत्रणाच्या दृष्टीने. मात्र, अर्थसंकल्पाने दीर्घकालीन विकास आणि राजकोषीय शिस्तीवर भर देत, अपेक्षांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे.

नागरिकांच्या अपेक्षा : कर सवलती आणि समावेशक विकासभारतीय नागरिक, विशेषतः मध्यमवर्गीय आणि नोकरदार वर्ग, अर्थसंकल्पाकडून मोठ्या अपेक्षा ठेवतात. महागाईच्या पार्श्वभूमीवर, प्राप्तिकर स्लॅबमध्ये बदल, प्रमाणित कपातीमध्ये वाढ (उदा. ५०,००० रुपयांवरून ७५,००० किंवा ९०,००० पर्यंत) आणि नव्या कर प्रणालीत जुन्या योजनेच्या सवलतींचा समावेश अशा अपेक्षा होत्या. वरिष्ठ नागरिकांसाठी आरोग्य विमा प्रीमियमवर अतिरिक्त कर सवलती, गृहकर्ज व्याजावर जास्त कपात आणि परदेशी शिक्षण/वैद्यकीय खर्चावर टीसीएस कमी करण्याची मागणी होती. तसेच, एमएसएमई आणि शेतकऱ्यांसाठी अनुदान वाढ, रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि हरित ऊर्जा क्षेत्रातील गुंतवणुकीच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षणाच्या अपेक्षा होत्या. आर्थिक सर्वेक्षणानुसार, २०२५-२६ मध्ये जीडीपी वाढ ७.४% आणि २०२६-२७ मध्ये ६.८-७.२% अपेक्षित असल्याने, नागरिकांना विकासाचा फायदा मिळावा अशी अपेक्षा होती. मात्र, जागतिक अनिश्चितता (उदा. अमेरिकेतील ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांचा प्रभाव) लक्षात घेता, सरकारने सावध पावले उचलली.

**राजकोषीय शिस्त आणि गुंतवणूक :**

अर्थसंकल्पाने तीन 'कर्तव्यां'वर भर दिला. आर्थिक वाढ करणे, नागरिकांच्या आकांक्षांचा पूर्ती आणि 'सबका साथ, सबका विकास'. राजकोषीय घाटा ४.४% वरून ४.३% करण्यात आला, तर कर्ज-जीडीपी गुणोत्तर ५६.१% वरून ५५.६% आणण्यात आले. भांडवली खर्च (कॅपेक्स) ११.२ लाख कोटींवरून १२.२ लाख कोटी करण्यात आला, जो आर्थिक वाढीचा मुख्य आधार आहे. उत्पादन क्षेत्रासाठी सात रणनीतिक क्षेत्र (औषधे, सेमीकंडक्टर, दुर्मीळ खनिजे, रसायने, भांडवली वस्तू, कापड आणि क्रीडा वस्तू) निवडण्यात आले. बायोफार्मा शक्ती योजनेसाठी १०,००० कोटी, एमएसएमई वाढ निधीसाठी १०,००० कोटी आणि दुर्मीळ खनिजांसाठी समर्पित कॉरिडॉरची घोषणा झाली. प्राप्तिकर कायद्यात बदल, नवीन प्राप्तिकर कायदा एप्रिल २०२६ पासून लागू आणि परदेशी खर्चावर टीसीएस कमी करण्यात आला. मात्र, फ्यूचर्सवरील एसटीटी ०.०२% वरून ०.०५% करण्यात आला, जो शेअर बाजारावर परिणाम करू शकतो. संरक्षणासाठी ५.९ लाख कोटी (२१% वाढ) आणि पायाभूत सुविधांसाठी सात हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा झाली.

**अर्थव्यवस्थेवर परिणाम :** जीडीपी वाढ आणि स्थिरताहा अर्थसंकल्प भारताच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम करेल. राजकोषीय शिस्तीमुळे व्याज खर्च कमी होईल, ज्यामुळे प्राथमिक क्षेत्रांसाठी अधिक निधी उपलब्ध होईल. आर्थिक सर्वेक्षणानुसार, जीडीपी वाढ ७% पेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे, कारण भांडवली खर्च आणि उत्पादन क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे उत्पादकता वाढेल. मात्र, जागतिक मंदी आणि व्यापार अडथळ्यांमुळे आव्हाने आहेत. अर्थसंकल्पाने मागणीऐवजी पुरवठा-संबंधित वाढीवर भर दिला, ज्यामुळे दीर्घकालीन स्थिरता मिळेल. कर्ज कमी करण्याचे धोरण भारताला जागतिक गुंतवणूकदारांसाठी आकर्षक बनवेल, परकीय गुंतवणूक वाढवेल आणि रुपयाला स्थिरता देईल. मात्र, कर सवलती कमी असल्याने मध्यमवर्गीय उपभोग कमी होऊ शकतो, ज्याचा जीडीपीवर अप्रत्यक्ष परिणाम होईल.

**उत्पादन ते पायाभूत सुविधाउत्पादन क्षेत्र:** सात रणनीतिक क्षेत्रांवर भर देऊन, अर्थसंकल्प उत्पादनाचे जीडीपीमधील हिस्सा २०% वरून २५% पर्यंत वाढवण्याचा प्रयत्न करतो. सेमीकंडक्टर आणि बायोफार्मासाठी सवलती, आयात शुल्क कमी आणि इनपुट्सवर माफी यामुळे घरेलू उत्पादन वाढेल, रोजगार निर्माण होईल आणि आयात अवलंबन कमी होईल. मात्र, उत्पादनाचे हिस्सा अद्याप २०% च्या खाली आहे, त्यामुळे अंमलबजावणी महत्त्वाची.

**एमएसएमई क्षेत्र:** १०,००० कोटीचा वाढ निधी आणि सोपी कर प्रक्रिया यामुळे एमएसएमई 'चॅम्पियन' बनतील. हे क्षेत्र पुरवठा साखळी, रोजगार आणि निर्यातीचे मुख्य आधार आहे, त्यामुळे अर्थव्यवस्थेला गती मिळेल.

**पायाभूत सुविधा:** १२.२ लाख कोटी कॅपेक्स, हाय-स्पीड रेल्वे आणि नवीन जलमार्ग यामुळे कनेक्टिव्हिटी वाढेल, आर्थिक केंद्रे विकसित होतील आणि जीडीपी वाढेल. शहर आर्थिक क्षेत्रांसाठी ५,००० कोटी प्रति क्षेत्र यामुळे शहरी विकासाला चालना मिळेल.

**संरक्षण आणि ऊर्जा:** संरक्षण कॅपेक्स २४% वाढून ५.९ लाख कोटी झाला, ज्यामुळे घरेलू उत्पादन आणि रोजगार वाढेल. ऊर्जा सुरक्षेसाठी दुर्मीळ खनिज कॉरिडॉर आणि सोलर/लिथियम आयन बॅटरीसाठी सवलती हरित वाढीला प्रोत्साहन देतील.

**आरोग्य आणि पर्यटन:** कर्करोग औषधांवर शुल्क माफी आणि पर्यटन साइट्ससाठी कौशल्य कार्यक्रम यामुळे सेवा क्षेत्र मजबूत होईल, रोजगार वाढेल.

**वित्तीय क्षेत्र:** एसटीटी वाढीमुळे शेअर बाजारात चढ-उतार होऊ शकतो, मात्र कर सुलभीकरण आणि फेमा पुनरावलोकन परकीय गुंतवणूक वाढवेल.

एकूणच दीर्घकालीन दृष्टीकोन हा अर्थसंकल्प अपेक्षांचे पूर्ण समाधान करत नसला तरी, तो भारताला 'विकसित भारत' बनवण्याच्या दिशेने पाऊल टाकतो. राजकोषीय शिस्त, गुंतवणूक आणि कौशल्य विकास यामुळे जीडीपी वाढ सातत्यपूर्ण राहील. मात्र, अंमलबजावणी आणि जागतिक घटकांवर यश अवलंबून आहे. सरकारने नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेऊन, अधिक समावेशक धोरणे आणावीत, जेणेकरून विकासाचा फायदा सर्वांपर्यंत पोहोचेल.

# माझ्या आवडत्या नेत्यांपैकी एक,
## अजितदादांच्या नेतृत्वाची उणीव कायम जाणवेल : विवेक कोल्हे




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**कोपरगाव** : महाराष्ट्राच्या राजकारणातील झंझावाती नेतृत्व, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून, ही हानी कधीही न भरून निघणारी आहे, अशी भावना युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी व्यक्त केली. स्व.अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कोपरगाव येथील कलश मंगल कार्यालयात सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेस विवेकभैय्या कोल्हे यांनी उपस्थित राहून स्व. अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी बोलताना विवेकभैय्या कोल्हे म्हणाले की, स्व. अजितदादा पवार हे केवळ एक कणखर प्रशासक नव्हते, तर जमिनीवरचा नेता म्हणून त्यांनी सामाजिक आणि राजकीय जीवनात अनेकांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या सोबतच्या आठवणी आजही प्रेरणादायी असून, त्या आठवणींना उजाळा देताना मन गहिवरून येते.मुख्यमंत्री दालनात दादांच्या अपघातापूर्वी काही तास अगोदर झालेली भेट आणि चर्चा कायम स्मरणात राहील. अनेकदा दादांनी भेटीसाठी दिलेली वेळ आणि तंतोतंत त्या आधीच निरोप यायचा आपण आलाय का ? इतकी वेळेची काटेकोरता होती.अगदी अपघात होण्यापुर्वी शेवटच्या स्वाक्षरी देखील जनतेच्या कामाच्या फाईलवर करून उशिरा पर्यंत काम केले असे जनतेसाठी वाहून घेतलेले नेतृत्व काळाने आपल्यापासून हिरावले आहे. विविध संस्थाच्या कामकाजाबद्दल आमची होणारी भेट आणि त्या मिटिंगमध्ये मला आवर्जून विवेक तुला काही मांडायचे आहे का असे विचारणारे ते नेते होते.माझ्यासारख्या अनेक युवकांना शिकण्यासारखे खूप काही होते.राज्याच्या विकासासाठी त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय आणि सामान्य जनतेशी असलेली त्यांची नाळ कायम स्मरणात राहील. स्व. अजितदादांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही. त्यांच्या कार्यातून आणि विचारातूनच त्यांना खरी श्रद्धांजली अर्पण करता येईल, असेही त्यांनी नमूद केले. या कठीण प्रसंगी ईश्वराने संपूर्ण पवार कुटुंबियांना दुःखातून सावरण्याचे बळ द्यावे, अशी प्रार्थनाही विवेकभैय्या कोल्हे यांनी यावेळी व्यक्त केली. या सर्वपक्षीय शोकसभेस विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोपरगावात शासकीय मका खरेदी केंद्राचा शुभारंभ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**पोहेगांव** : पुरवठा विभाग गोदाम,तहसील कार्यालय कोपरगाव येथे शासकीय मका खरेदी केंद्राचा शुभारंभ नुकताच तहसीलदार महेश सावंत यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी कोपरगाव व राहता तालुक्यासाठी शासकीय हमीभाव खरेदी केंद्रासाठी नियुक्त केलेली अधिकृत संस्था बहादराबाद विविध कार्यकारी सेवा सह सोसायटी व पुरवठा विभाग तहसील कार्यालय कोपरगाव यांनी संयुक्तिक तपासणी करून चांगल्या प्रतीची व शासनाला अभिप्रेत असलेली एफ.ए.क्यू दर्जाचीच मका खरेदी करावी अशा सूचना तहसीलदार महेश सावंत यांनी दिल्या. त्याचप्रमाणे शासकीय हमीभाव केंद्रावर साधारणपणे एक हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली असून त्या सर्व शेतकऱ्यांची मका खरेदी केली जाईल. त्यामुळे नोंदणीकृत शेतकऱ्यांनी मका शासकीय हमीभाव केंद्रावर देऊन आपले आर्थिक नुकसान टाळावे असे आवाहन माननीय तहसीलदार यांनी केले.

यावेळी तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे,सहाय्यक निबंधक संदीप रुद्राक्ष, तालुका पुरवठा अधिकारी अमोल फोपसे, निरीक्षक अधिकारी गायकवाड, पुरवठा निरीक्षक अदिती भालेराव, गोदामपाल गणेश गरुड, पुरवठा सहाय्यक निलेश चौधरी,रजनी पवार, सरपंच विक्रम पाचोरे, संचालक बाळासाहेब पाचोरे, सुखलाल गांगवे, राहुल पाचोरे, गजानन ठोंबरे यांसह बहादराबाद विविध कार्यकारी सोसायटीचे पदाधिकारी व लाभार्थी शेतकरी उपस्थित होते.

## सोनेवाडीत होळीची मुहूर्तमेढ रोवली आज पासून दिवस वाढणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**कोपरगाव** : तालुक्यातील सोनेवाडी येथे काल पौर्णिमेला गावाच्या वेशी मध्ये ऊस व एरंडाचा दांडा रोवुन होळीची चाहुल देण्यात आली.आज



पासून दिवस वाढण्यास सुरुवात झाली आहे.
आज आपल्या सोनेवाडी गावात सालाबाद प्रमाणे याही वर्षी आज होळीची सुरवात करण्यात आली. जेष्ठ ग्रामस्थ आनाजी पोपट जावळे यांच्या हस्ते पुजा अर्चा करण्यात आली. पूजा विधीचे काम सालाबाद प्रमाणे मनराज खरे यांनी केले यावेळी आनाजी जावळे,अहिलाजी जावळे,बबलु जावळे, सोमनाथ रायभान, आदिनाथ जावळे, लक्ष्मण जावळे,मनराज खरे अदि उपस्थित होते.दांडी पौर्णिमा, ज्याला होळीचा मुहूर्त असेही म्हणतात, ही फाल्गुन पौर्णिमेला गावाच्या मध्यभागी किंवा चव्हाट्यावर एरंडाची फांदी लावून साजरी केली जाते. या दिवशी होळीची मुहूर्तमेढ रोवली जाते आणि त्यानंतर फाल्गुन शुध्द पंचमीपासून होळीसाठी लाकडं व गवऱ्या गोळा करण्यास सुरुवात होते. होळी सणासाठी ग्रामीण भागात अजूनही लाकडे व गवरी चोरून आणण्याची परंपरा आहे. सोनेवाडीत प्रत्येक सणाला रीती रीवाजाप्रमाणे महत्त्व दिले जाते.

# राष्ट्रीय मतदार दिनी लोकशाहीचा जागर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**श्रीरामपूर:** लोकशाहीमध्ये मताची मोठी ताकद असून, प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे, असे प्रतिपादन श्रीरामपूरचे उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी किरण सावंत पाटील यांनी केले. श्रीरामपूर तहसील कार्यालयात आयोजित १६ व्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांनी मतदार दिनाचा इतिहास आणि उद्देश स्पष्ट



केला. यावेळी व्यासपीठावर नाशिक विभागाचे राज्य कर उपायुक्त अनिल काळे, श्रीरामपूर प्रधान डाकघरचे पोस्ट मास्तर महेश कोबरणे आणि तहसीलदार मिलिंदकुमार वाघ उपस्थित होते. राज्य कर उपायुक्त अनिल काळे यांनी बीएलओ म्हणून केलेल्या आपल्या जुन्या कामाच्या आठवणींना उजाळा देत प्रशासकीय अनुभवांचे महत्त्व सांगितले. तसेच महेश कोबरणे यांनी पोस्ट विभागामार्फत मतदार ओळखपत्रे वेळेत पोहोचवण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी निवडणूक प्रक्रिया आणि जनजागृतीमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, बीएलओ, पत्रकार आणि पोलीस पाटील यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. शेवटी सर्वांनी लोकशाही बळकट करण्यासाठी 'मतदार शपथ' घेतली.

# देवगड देवस्थानसाठी निधी कमी पडू देणार नाही : आ खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील श्री क्षेत्र खंडोबा देवगड देवस्थानचा 'ब' वर्गात समावेश झाला आहे. त्यामुळे येत्या काळात या देवस्थानाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला जाईल. देवस्थानाच्या विकासासाठी भविष्यात कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू दिला जाणार नाही, असा ठाम विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पावसा येथील प्रतिजेजुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवगड येथील खंडोबा महाराज यात्रोत्सवनिमित्त आमदार खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते खंडोबा मल्हार मार्तंडाची महाआरती करण्यात आली. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग व अश्वारूढ संघटना, हिवरगाव पावसा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या अश्व व पशुपक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार खताळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खंडोबा देवगड देवस्थानपासून अश्वप्रदर्शनापर्यंत निघालेल्या मिरवणुकीतील रथाचे आमदार अमोल खताळ आणि त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी सारथ्य केले.

आ. खताळ म्हणाले की, देवगड येथे यात्रोत्सवानिमित्त येणाऱ्या खंडोबा भक्तांची कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. या देवस्थानाकडे जाणाऱ्या रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली असून पुलाचाही प्रश्न मार्गी लावण्यात आला आहे. या कामांसाठी निधी उपलब्ध करून देताना कुठेही हात आखडता घेतलेला नाही.

या यात्रोत्सवनिमित्त दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी अश्वप्रदर्शन आयोजित करण्यात आले असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या अश्वप्रदर्शनात विविध जातीचे अश्व सहभागी झाले आहेत. देवस्थानाच्या विकासासाठी आपण प्रयत्नशील राहू आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या स्मारकाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या परिसरातील बहुतांश विकासकामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मधल्या काळात नागरिकांनी मांडलेला पाणी पुरवठ्याचा प्रश्न सुद्धा उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून मार्गी लावला जाणार आहे या खंडोबा देवस्थान च्या माध्यमातून पर्यटनवाढ कशी होईल यासाठीही विशेष प्रयत्न केल जातील, असेही आमदार अमोल खताळ यांनी सांगितले. याप्रसंगी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष श्री. काशिनाथ पावसे, देवगड अश्व सेवा संस्थेचे अध्यक्ष . उत्तम जाधव, हिवरगाव पावसा गावचे सरपंच सुभाष गडाख, उपसरपंच सौ.सुजाता दवंगे यांच्यासह भाऊसाहेब जाधव,



केशव दवंगे, गणेश दवंगे, सोमनाथ भालेराव, सुधीर शेळके, मकरंद मुळे, मथाजी पावसे, नारायण पावसे, बाबुराव पावसे, कैलास दिवटे, गणपत पावसे गोरख पावसे यांच्यासह इतर मान्यवर व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# वैद्यकीय शिक्षणासाठी नागरिकत्व त्यागून एनआरआय कोट्यातून प्रवेशाची चढाओढ

भारतीय शिक्षण व्यवस्थेत वैद्यकीय प्रवेशासाठी अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेनंतर आता एक धक्कादायक आणि तितकाच विदारक कल समोर आला आहे. केवळ एका जागेसाठी लाखो विद्यार्थी जीवतोड मेहनत करत असताना, दुसरीकडे भारतीय नागरिकत्वाचा त्याग करून 'अनिवासी भारतीय' होण्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढला आहे. मेडिकल काउंसलिंग कमिटीने नुकतीच २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या तिसऱ्या फेरीसाठी अशा ८११ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे, ज्यांनी केवळ प्रवेश प्रक्रियेत सुलभता मिळावी म्हणून स्वतःची ओळख बदलून एनआरआय श्रेणी निवडली आहे. ही आकडेवारी केवळ प्रवेशाची धडपड नसून, ती भारतीय शिक्षण व्यवस्थेतील वाढत्या स्पर्धेचे आणि त्यातून शोधल्या जाणाऱ्या पळवाटांचे प्रतिबिंब आहे.

या कलमागील सर्वात मुख्य कारण म्हणजे एनआरआय कोट्यातील अत्यंत शिथिल असलेली प्रवेश पात्रता. सामान्य कोट्यातून सरकारी किंवा नामांकित खाजगी महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांना गगनचुंबी गुणांची (कट-ऑफ) गरज असते, मात्र एनआरआय कोट्यात ही स्पर्धा कमालीची कमी होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, जिथे हजारो गुण मिळवूनही विद्यार्थ्यांना प्रवेशाची खात्री नसते, तिथे या विशेष श्रेणीतील पहिल्या गटात केवळ १० टक्के गुणांवर, म्हणजेच ८०० पैकी साधारण ८२ गुणांवरही प्रवेशाचे दरवाजे उघडले जातात. तर दुसऱ्या श्रेणीतील जवळच्या नातेवाईकांच्या कोट्यातून केवळ २८ गुणांवरही विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणाची संधी शोधत आहेत. ही दरी गुणवत्ता आणि आर्थिक सक्षमता यातील संघर्षाला अधोरेखित करते.

आर्थिक बळ आणि गुणवत्तेचे समीकरण हे प्रवेश मिळवणे तांत्रिकदृष्ट्या सोपे असले तरी, त्यासाठी मोजावी लागणारी किंमत सामान्य भारतीयांच्या कल्पनेपलीकडची आहे. एनआरआय कोट्यातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांचे शुल्क प्रचंड असते. पदव्युत्तर शिक्षणासाठी तर हे शुल्क ४५ लाख रुपयांपासून थेट ९५ लाख रुपयांपर्यंत पोहोचते. हे शुल्क राज्य आणि विद्यापीठांनुसार बदलत असले तरी, 'पैसा फेको, सीट मिळवा' अशीच काहीशी स्थिती या कोट्यामुळे निर्माण झाल्याचे दिसते. अनेकदा या जागा रिक्त राहिल्यास त्यांचे रूपांतर मॅनेजमेंट कोट्यात केले जाते, जिथे शुल्कात थोडी सवलत मिळू शकते, परंतु मूळ हेतू हा कमी गुणांवर प्रवेश मिळवणे हाच असतो.

या ८११ उमेदवारांच्या वर्गीकरणाकडे पाहिल्यास असे लक्षात येते की, स्वतः एनआरआय असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ११३ इतकी मर्यादित आहे, तर ६९८ विद्यार्थ्यांनी केवळ आपल्या जवळच्या नातेवाईकांच्या एनआरआय स्टेटसचा आधार घेऊन या कोट्याचा लाभ घेण्याचा प्रयत्न केला आहे. ही आकडेवारी स्पष्ट करते की, भारतात वैद्यकीय पदवी मिळवणे हे आता केवळ बुद्धिमत्तेवर अवलंबून न राहता, उमेदवाराची आर्थिक पार्श्वभूमी आणि जागतिक स्तरावरील त्याच्या ओळखीवर अधिक अवलंबून होत चालले आहे. भारतीय नागरिकत्व सोडून विदेशी ओळख स्वीकारण्याची ही धडपड भविष्यातील डॉक्टरांच्या गुणवत्तेवर आणि देशातील शिक्षण व्यवस्थेतील नैतिकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.

**प्रशांत बाफना**
**मो. ८०५५४४०३८५**

# आजच्या युवकांनी संत रोहिदास महाराजांचा आदर्श घ्यावा : सुनील गडाख



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**
**सोनई** - श्री संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात चर्मकार समाज मंदिरात साजरी करण्यात आली.. त्यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती जिल्हा परिषद बांधकाम समितीचे माजी सभापती सुनील गडाख यांच्या हस्ते व समाज बांधवांच्या हस्ते करण्यात आले.
याप्रसंगी गडाख म्हणाले, श्री संत रोहिदास महाराजांनी समाजाला सुधारित मूल्य सांगून समाजाची उन्नती उपदेश करून त्यांचा इतिहास जाणून घेण्याचे आवाहन गडाख यांनी केले.

त्यावेळी युवा कार्यकर्ते प्रकाश शेटे,पत्रकार विजय खंडागळे, पत्रकार विनायक तात्या दरंदले, सुजाता स्कूलचे संचालक किरण सोनवणे, सोनई सोसायटीचे माजी अध्यक्ष आप्पासाहेब निमसे, फोटोग्राफर संतोष तेलोरे, माजी ग्रामपंचायत सदस्य रमेश तेलोरे,किशोर साळवे, शांताराम साळवे, बाळासाहेब उदमले सह चर्मकार समाज मोठ्या संख्येने व ग्रामस्थ उपस्थित होता. यावेळी सायंकाळी हभप आकाश महाराज धाकतोडे यांचे प्रवचन होऊन महाआरती, महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

संत रोहिदास महाराज गणेश तरुण मंडळ,आई भवानीनवरात्र उस्थव मंडळ यांनी कार्यक्रमसाठी परिश्रम घेतले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# द • ख • ल

## हरिगांव येथे संत शिरोमणी रविदास महाराज जयंती साजरी



**शिरसगाव** : हरेगाव येथे संत शिरोमणी रविदास महाराज जयंती मोठ्या उत्सहात साजरी करण्यात आली. यावेळी हरेगाव शेतकरी संघटनेचे नेते, सतीश नाईक, ग्रा.प. सदस्य सुनिल शिनगारे, उप सरपंच दिलीप त्रीभुवन , राजू चव्हाण, दिपक चव्हाण, संजय चव्हाण, आशिष जाधव,आकाश सूर्यवंशी,अतुल भालेराव, संदीप धनेधर, संजय महाले, व्हासळे गुरुजी, अशोक बनकर, शेळके, मारुती शरणागत, नाना लिहिणार, काळू बावसकर, अरुण बनसोडे, ग्रा.प.सदस्य रमेश भालेराव, विनायक वाघमारे, डॉ. नंदू वाघमारे, रोहित कोळगे, पुष्प हार अर्पण करून प्रथमतः अभिवादन करण्यात आले. बाबसाहेबांनी संत रविदास महाराज यांना अर्पण केला. कर्म कांडातून मुक्त करण्या साठी वाचन केले पाहिजे. असे अनेक मुद्दे सांगून महापुरुष विचाराने एक होते हे आपल्या प्रबोधनातून सांगितले, कार्यक्रम यशस्वी करण्या साठी राजू चव्हाण, संजय चव्हाण,दिपक चव्हाण,अहिलू बन्सी ,गोविंद सूर्यवंशी, कोळगे गावठाण मित्र मंडळ सर्व युवक कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कमी पटसंख्येतून जिल्हास्तरावर यशाची भरारी




**कोपरगाव** : संकल्प, परिश्रम आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोलकी येथील विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत यशाची भरारी घेतली आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगर शिक्षण विभागातर्फे आयोजित समूहगीत गायन स्पर्धा (लहान गट) – शालेय पोषण आहार गीत हे समुह गीत शाळेच्या संघाने सादर करून तृतीय क्रमांक पटकावला. कमी पटसंख्या असूनही प्रथमच जिल्हा स्तरावर पोहोचून मिळवलेले हे यश इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या यशामागे महेंद्र विधाते मुख्याध्यापक, सांस्कृतिक विभाग प्रमुख स्वाती लकुडझोडे शिक्षकवृंद व पालकांचा मोलाचा वाटा असून शाळा व्यवस्थापन समिती व सरपंच,उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य, विविध विकास सोसायटी चेअरमन व सर्व सदस्य व समस्त बोलकी ग्रामस्थांनीही अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

## जि.प. सोनेवाडीचा साई आल्हाट जिल्ह्यात तृतीय



**कोपरगाव** : अहिल्यानगर येथील रेसिडेन्शियल हायस्कूल येथे पार पडलेल्या विविध गुणदर्शन व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये वैयक्तिक गीत गायन या प्रकारात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनेवाडी, तालुका कोपरगाव येथील इयत्ता सातवीचा विद्यार्थी साई विकास आल्हाट याने उत्कृष्ट सादरीकरण करत जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकावला. कोपरगाव तालुका पातळीवरील स्पर्धेतही त्याने प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यामुळे त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.

तालुका स्तरावर प्रथम क्रमांक पटकावलेले चौदा तालुक्यातील विद्यार्थी या जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते. कोपरगाव तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी शबाना शेख , विस्तार अधिकारी संजीवनी आंबिलवादे, सरपंच शकुंतलाताई गुडघे, निरंजन गुडघे,उपसरपंच संजय गुडघे, केंद्रप्रमुख विलास भांड, मुख्याध्यापक महेंद्र रहाणे, शिक्षक विलास गवळी, कविता पानसरे आदींनी साईचे अभिनंदन केले आहे.

## सौर उर्जा प्रकल्प पुणतांब्यासाठी वरदान : चव्हाण

**पुणतांबा** : जलसंपदामंत्री ना राधाकृष्ण विखे यांच्या प्रयत्न व पाठपुराव्यामुळे पुणतांबा –रास्तापूर शिवारात महाराष्ट्र राज्य शेतीमहामंडळाच्या अंदाजे ७८ एकर क्षेत्रावर भव्य अशा सौर उर्जा प्रकल्पाचे काम सुरु झाले आहे. या प्रकल्पामुळे पुणतांबा परिसराच्या विकासाला चालना मिळणार आहे असे प्रतिपादन खंडकरी शेतकऱ्यांचे नेत बाळासाहेब चव्हाण यांनी केले आहे. गट क्रंमाक ४ ३,४४,४५ व ४६ मध्ये ह्या सौर उर्जा प्रकल्पाची कामे सुरु झाली आहेत. हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर पुणतांब्यासह राहाता तालुक्याचा विजेचा प्रश्न कायमचा सुटणार आहे.

# विकासासोबत रोजगारनिर्मितीला प्राधान्य : ना. राधाकृष्ण विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : विकासाच्या बरोबरीने रोजगार निर्माण करण्यास आपले प्राधान्य आहे. पायाभूत सुविधांची काम सुरू आहेत, यासाठी निधीची उपलब्धता होत असून, गावातील प्रश्न एकत्रितपणे बसूनच सोडविण्याचा सल्ला जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मतदार संघातील गावांमध्ये संपर्क अभियान सुरू केले. थेट गावात जावून नागरीकांचे प्रश्न समजून घेतानाच विकास प्रक्रीये बाबत स्थानिकांची मत जाणून घेत आहेत.



मंत्री विखे पाटील यांनी पाथरे बु, कोल्हार, भगवतीपूर या गावात जावून ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांच्या भेटी घेतल्या. महायुती सरकारच्या माध्यमातून सुरू असलेल्या योजनांची अंमलबजावणी गावातील रस्ते, ड्रेनेज, आरोग्य व्यवस्था, अतिक्रमणाची परीस्थीती या विषयावर त्यांनी मंडल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक यांना महत्वपूर्ण सूचना केल्या. विकास प्रक्रीयेला अडथळा निर्माण करणारी अतिक्रमण तातडीने काढून टाकण्यासाठी गांभीर्याने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विकासाची प्रक्रिया निरंतर सुरू असली तरी, विकासाच्या संकल्पना पुर्णपणे बदलल्या आहेत.

गावाचा चेहरा बदलण्यासाठी उद्योग आणि रोजगाराच्या निर्मिती शिवाय पर्याय नाही. त्यामुळेच उद्योग निर्मितीला विकासाचा भाग बनविला असल्याचे विखे पाटील म्हणाले. शिर्डी औद्योगिक वसाहतीमध्ये निबे उद्योग समूहाचा उभा राहीलेला प्रकल्प संपूर्ण जिल्ह्याची मोठी ओळख ठरणार असल्याचा विश्वास व्यक्त करून, आणखी अनेक चांगले उद्योग समूह आपल्या भागात येण्यास तयार असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. जलसंपदा विभागाच्या कामाना निधीची कमरता भासणार नाही.

प्रवरा कालव्याच्या कामाकरीता १५० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे, या कामातून कालव्याची काम होतील. नदीजोड प्रकल्पाचे काम वेगाने सुरू झाले आहे. भंडारदारा, निळवंडे धरणातील पाण्याचा साठा तसेच आवर्तनाचे नियोजन करण्यासंदर्भात अधिका–यांची आपण बैठक घेतली असून उन्हाळी हंगामातील पाण्याच्या आवर्तनाबाबत आढावा घेतला असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. गावपातळीवर गटातटाच्या वादात विकासाची प्रक्रीया अडकू देवू नका असा सल्ला देवून, वर्षानुवर्ष सुरू असलेले वाद सामजस्याने मिटविण्यासाठी गावातील लोकांनीच एकत्रितपणे पुढाकार घेण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

# माघ पौर्णिमेनिमित्त देवगड येथे हजारो भाविकांची मांदियाळी





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : माघ पौर्णिमेच्या निमित्ताने नेवासा तालुक्यातील भू लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या गुरूदेव दत्त पीठ श्री क्षेत्र देवगड येथे हजारो भाविकांनी भगवान दत्तात्रयांसह श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.यावेळी झालेल्या महाआरतीला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.दिवसभरात सुमारे एक लाख भाविकांनी दर्शन घेतले. रविवारी आलेल्या माघ पौर्णिमेच्या निमित्ताने पहाटे पासूनच भाविकांची दर्शनासाठी गर्दी झाली होती. देवगड येथील भगवान दत्तात्रयांच्या मुख्य मंदिरासमोर तसेच श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा समाधी मंदिर प्रांगणात भाविकांची दर्शनासाठी बारी लागली होती. यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांचे गुरुदेव दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्र संत गुरुवर्य भास्करगिरी महाराज व देवगड संस्थानचे उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांनी स्वागत केले.

यानिमित्ताने नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम,नेवासा बुद्रुक,जळके खुर्द,गंगापूर तालुक्यातील पुरी या गावातील पायी दिंड्यांनी हजेरी लावली या सर्व दिंडीतील चालकांचा श्रीफळ प्रसाद देऊन गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. माघ पौर्णिमे निमित्त दुपारी झालेल्या आरती प्रसंगी मंदिर प्रांगण गर्दीने फुलून गेले होते.यावेळी संभाजीनगर हायकोर्ट मॅटचे न्यायाधीश विनय कारगावकर यांनी भेट दिली. यावेळी झालेल्या महाआरती प्रसंगी बाळासाहेब महाराज रंजाळे,स्वामी प्रकाशानंदगिरी महाराजांचे पिताश्री दिनकरजी महाराज मते,गणपत महाराज आहेर,देवगड संस्थानचे सेवेकरी बाळू महाराज कानडे,तात्या महाराज शिंदे,रोहित महाराज पटारे,संतोष महाराज रायपूरे,शशिकांत महाराज कोरेकर,शुभम महाराज बनकर, भानुदास महाराज भिसे बाबा,शंकर महाराज तनपूरे, सोमनाथ महाराज पानकडे,सेवेकरी बद्रीनाथ फोलाने, अजय साबळे,नेवासा डेपोचे सेवानिवृत्त आगार व्यवस्थापक सुरेश देवकर, भीमाशंकर वरखडे यांच्यासह भजनी मंडळाचे सेवेकरी,संस्थानचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**(छाया- सुधीर चव्हाण नेवासा)**

# श्रीराम माध्यमिक विद्यालयात बालविवाह प्रतिबंध कायदेविषयक शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री




**झरेकाठी** : श्रीराम माध्यमिक विद्यालय निंभोरे येथे तालुका विधी सेवा समिती आयोजित बालविवाह प्रतिबंध कायदेविषयक शिबिर घेण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन करून झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष पवार वरिष्ठ न्यायालयाचे न्यायमूर्ती हे होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक देशपांडे ज्येष्ठ विधीतज्ञ कांबळे विधी तज्ञ हे होते. अध्यक्ष यांचा सत्कार ड बी.एफ. दिवे संस्थापक सचिव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्था यांच्या हस्ते झाला. तसेच निंभेरे ग्रामपंचायतचे विद्यमान सरपंच शांताराम सिनारे ग्रामपंचायतचे वतीने सत्कार केला. आपल्या अध्यक्षीय भाषणात पवार यांनी अल्पवयीन विवाह रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही तसेच उपाययोजना खबरदारी यावर कायदे विषयक मार्गदर्शन व बालविवाह प्रतिबंध शपथ दिली. मान्यवरांचे स्वागत मुख्यध्यापक तनपुरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक संसारे यांनी केले. आभार प्रदर्शन खपके ज्येष्ठ विधीतज्ञ राहुरी यांनी केली.

# प्रा. डॉ. विजय कदम यांना 'मेस्टा'चा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**बालाजी देडगाव** : महाराष्ट्र इंग्लिश मीडियम स्कूल्स ट्रस्टीज असोसिएशन (मेस्टा) संघटनेचे आकरावृ राज्य राज्यस्तरीय अधिवेशनात आत्म मलिक ध्यानपीठ कोकणठाण येथे पार पडले. यावेळी राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता मिष्टा संघटनेचे अध्यक्ष डॉक्टर संजयराव तायडे पाटील यांच्या हस्ते अहमदनगर महाविद्यालयाचे इतिहास विभाग प्रमुख तथा तक्षशिला इंग्लिश मीडियम व ज्युनिअर कॉलेजचे संस्थापक प्रा. डॉ. विजय कदम यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. कोकमठाण येथील आत्ममलिक ध्यानपीठ येथे हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आ. किशोर दराडे, शिक्षणतज्ज्ञ सचिन जोशी आणि मेस्टा संघटनेचे संजयराव तायडे पाटील यांसह शिक्षण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.डॉ. विजय कदम यांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य आणि तक्षशिला ज्युनिअर कॉलेजच्या माध्यमातून दिलेले योगदान विचारात घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. हा पुरस्कार म्हणजे त्यांच्या शैक्षणिक निष्ठेचा गौरव असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. डॉ. कदम यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# विधवा महिलांप्रमाणेच विदुर पुरुषांनाही अनुदान मिळावे

## सोनेवाडी ग्रामसभेत अनोखा ठराव संमत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगाव** : एरवी ग्रामसभेत गावच्या हिताचे अनेक वेगवेगळे निर्णय घेतले जातात. आणि ते अमलातही आणले जातात. काल असाच एक निर्णय सोनेवाडी ग्रामसभेत घेण्यात आला. महाराष्ट्रातील निराधार व आर्थिक दुर्बल घटकातील विदुर पुरुषांना विधवा निराधार महिलेंप्रमाणेच शासकीय अनुदान मिळावे असा ठराव संमत करण्यात आला. या ठरावाची प्रत शासकीय दरबारी सादर करण्याची जबाबदारी ग्राम पंचायत अधिकारी भानुदास दाभाडे यांनी घेतली आहे. ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी सरपंच शकुंतलाताई गुडघे होत्या.यावेळी उपसरपंच संजय गुडघे, निरंजन गुडघे, ग्रामपंचायत सदस्य आबासाहेब जावळे, धर्मा जावळे, चिलु जावळे, किशोर जावळे, बापुराव जावळे, गणेश राऊत,तळाठी पुजा दडेवाल,कर्ना जावळे, बबलु जावळे,प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सेविका, अशा सेविका, शाळेचे मुख्याध्यापक, अंगणवाडी सेविका, विजय मिंड, अण्णासाहेब कांदळकर, बाळासाहेब जावळे, दिगंबर जावळे, दीपक जावळे, आबा दहे, यमाजी जावळे, सोमनाथ रायभान, किरण जावळे, शालिग्राम जावळे, विठ्ठल गुरसळ, रघुनाथ मिंड, परशराम जावळे, मच्छिंद्र गुडघे, भाऊसाहेब खरे, पुंजाहरी आव्हाड, नारायण जावळे, शंतनू घोंगडे श्याम जावळे अदी उपस्थित होते. ग्रामसभेच्या विषय पत्रिकेचे वाचन ग्रामपंचायत अधिकारी भानुदास दाभाडे यांनी केले. विधवा महिलांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी केंद्र आणि महाराष्ट्र शासनातर्फे अनेक योजना राबवल्या जातात.

यात प्रामुख्याने इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना (दरमहा १५०० रुपयांपर्यंत मदत) संजय गांधी निराधार अनुदान योजना यांचा समावेश आहे. या योजना ४० ते ६५+ वयोगटातील, बीपीएल (दारिद्र्यरेषेखालील) पात्र विधवांना आधार देतात. विधवा महिलांसाठी प्रमुख सरकारी योजना ही इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना सुरू आहे. याप्रमाणेच निराधार विदुर–पुरुषांना शासकीय अनुदान मिळावे अशी मागणीचा ठराव किशोर जावळे ग्रामसभेत ठेवला. यावर जोरदार चर्चा होत हा ठराव संमत करण्यात आला. शिर्डी एमआयडीसी संदर्भातील अनेक समस्या, गावातील पानंद रस्ते, अपंग व मागासवर्गीय निधी, तसेच गोदावरी उजव्या कालव्याचे कॉंक्रिटीकरण होऊ नये म्हणून ठराव घेण्यात आला. मुस्लिम स्मशानभूमीसाठी जागा उपलब्ध करणे तसेच हिंदू स्मशानभूमीचे सुशोभीकरण करणे या संदर्भात चर्चा झाली.

# माजी आ.नरेंद्र घुले पाटील यांचे 'रन फॉर हेल्थ' स्पर्धेत यश...

## अवघ्या ७० मिनिटांत १० किलोमीटरचे अंतर केले पार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भेंडा** : नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योग समुहाचे अध्यक्ष माजी आ.नरेंद्र घुले पाटील यांनी नगर येथे आयोजित मैक्सिमस नगर राइजिंग मॅरेथॉन मध्ये 'रन फॉर हेल्थ' स्पर्धेत पदक मिळविले असून त्यांनी अवघ्या ७० मिनिटांत १० किलोमीटरचे अंतर पार केले आहे. नगर येथे दरवर्षी मैक्सिमस नगर राइजिंग मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले जाते.

यावर्षी ही रविवार दि.१ फेब्रुवारी रोजी २०२६ मैक्सिमस नगर राइजिंग हाफ मॅरेथॉन स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत माजी आ.नरेंद्र घुले पाटील,डॉ. क्षितिज घुले पाटील,डॉ. प्रियंका पवार–घुले पाटील यांनी हाप मॅरेथॉन मध्ये दरवर्षी प्रमाणे सहभाग घेतला.

श्री.नरेंद्र घुले पाटील यांनी या वर्षी देखील १० किलोमीटर अंतर ७० मिनिटांत पार करून युवकांसमोर आदर्श ठेवला आहे. उद्योजक नरेंद्र फिरोदिया, छायाताई फिरोदिया, शोभाताई फिरोदिया, डॉ.तारडे यांचे हस्ते घुले यांना पदक प्रदान करून सन्मान करण्यात आला.

# प्रवरा ग्रामीण रुग्णालय पिंपरी लौकी उत्कृष्ट रुग्णसेवेचा मानांकन




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आश्वि** : ग्रामीण भागात रुग्णसेवा ही ईश्वर सेवा मानून काम करत असताना अवघ्या सहा महिन्यांमध्ये संगमनेर तालुक्यातील पिंपरी लौकी अजमपुर गावामध्ये रुग्णांना अतिशय तत्पर व चांगली सेवा दिल्यामुळे प्रवरा मेडिकल ट्रस्ट चा २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त दिला जाणारा उत्कृष्ट मानांकन हा मानाचा पुरस्कार प्रवरा ग्रामीण रुग्णालय पिंपरी लौकी अजमपुर या गावातील रुग्णालयाला चेअरमन राजेंद्र पाटील विखे यांच्या हस्ते वैद्यकीय अधिकारी डॉक्टर आहेर मॅडम यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद यांना बहाल करण्यात आला.

ग्रामीण भागात रुणालयाची नितांत गरज लक्षात घेऊन राज्याचे जलसंपदा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रवरा मेडिकल ट्रस्टचे चेअरमन राजेंद्र विखे पाटील यांच्या प्रेरणेने अवघ्या सहा महिन्यापूर्वी पिंपरी लोकी अजमपुर या गावांमध्ये या आरोग्य केंद्राची सुरुवात झाली व रोज ५० ते ६० रुग्णांवर यशस्वीरित्या उपचार करून रुग्णांना मोठा दिलासा दिला रुग्णांना अस्तावैक चौकशी करून विविध आजारावर जागेवरच औषध उपचार करून गरीब गरजू रुग्णांना मोठा फायदा झाला तसेच गावातील व परिसरातील अत्यवस्थ रुग्णाना म्बुलन्स द्वारे प्रवरा मेडिकल ट्रस्ट येथे पाठवून त्यांनाही योग्य असा औषधोपचार केल्यामुळे अनेकांचे प्राण वाचले आहे या रुग्णालयामार्फत विविध आजारावर माफक दरामध्ये उपचार केले जातात त्यामुळे या गावासह गावाशेजारील खळी पानोडी कांगणवाडी खर शिंदे वर शिंदे कनशेवाडी येथील रुग्णांनाही फायदा होत आहे.

या रुग्णालयामार्फत साठ वर्ष पुढील वृद्धांना मोफत उपचारासाठी दर सोमवारी मोफत गाडी द्वारे प्रवरा मेडिकल ट्रस्टमध्ये भरती करून विविध आजारांवरील चाचण्या करून त्यांना मोफत उपचार देण्यासाठी दर सोमवारी दहा ते पंधरा रुग्णांना पाठवले जाते. या गावातील वैद्यकीय सेवेचा व रुग्णांचा मिळणारा प्रतिसाद भक ता व रुग्णसेवेचा अतिशय सुंदर असा केलेल्या कामाचा आढावा घेऊन प्रवरा मेडिकल ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र पाटील विखे यांनी या रुग्णालयाला यावर्षीचा उत्कृष्ट कामाचा मानांकन दिल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून त्यांना शाबासकी दिली. भविष्य काळात या गावांमध्ये मेडिकल ट्रस्टच्या माध्यमातून दंत रुग्ण बाह्य रुग्णविभाग मेडिसिन इत्यादी विभाग चालू करून अधिक अधिक उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. या रुग्णालयाला मिळालेला पुरस्कार निश्चितपणे या गावाचा विकासात्मक रुग्णसेवेचा अभिमान आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व कर्मचाऱ्यांचे ना. राधाकृष्ण विखे, शालिनीताई विखे, डॉ. सुजय विखे मेडिकल ट्रस्टचे विश्वस्त ध्रुवविखे पाटील सामाजिक कार्यकर्ते व जनसेवा मंडळाचे अध्यक्ष भारत गिते, सरपंच संगिता गिते, उपसरपंच बाजीराव गिते, ग्रामपंचायत सदस्य अनिल गीते, दौलत दातीर, चांगदेव कदम, विकास दातीर, चित्रा गीते यांच्यासह ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.


**ॲड.विजय हस्तीमल चंगेडिया**
**बी.कॉम.एम.बी.ए.(फायनांस)**
**डी.टी.एल.एल.एल.बी.**
**नेवासा कोर्ट, ता.नेवासा, जि.अ.नगर**
**मो.९८२२०७७०८७**
**रजि.नं.महा./१८००/१९९२**

**ॲड.आनंद विजय चंगेडिया**
**बी.एस्सी.एल.एल.बी**
**ॲड.अभिजीत नंदकुमार पाटील**
**बी.ए.एल.एल.बी**
**नेवासा कोर्ट, ता.नेवासा, जि.अ.नगर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना आमचे पक्षकार श्री. सतिष मोतीलाल गांधी रा. नेवासा फाटा, ता. नेवासा, जि.अहिल्यानगर यांनी दिलेल्या माहीतीवरुन व दाखविलेल्या कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे पक्षकाराची मौजे हंडीनिमगाव, ता. नेवासा येथे गट नं. १७ पैकी प्लॉट नं.१ ही मिळकत असुन ती रजिस्टर दस्त नं. १२७६/१९९४ ने त्यांनी खरेदी केलेली आहे. सदर मिळकतीचे खरेदीखत त्यांचेकडुन दि.२४/०१/२०२६ रोजी नेवासा फाटा ते हंडीनिमगाव, या रस्त्यावरती गहाळ झालेले असुन त्या संबंधीचा हरवलेल्या मालमत्तेचा नोंदणीचा अर्ज नेवासा पोलीस स्टेशनला हरवलेल्या मालमत्तेचा (००४६/२०२६) या क्रमांकाने दि.३०/०१/२०२६ रोजी मिसींग रजिस्टरने नोंदलेला आहे. जर कोणाला संबंधीत दस्त आढळुन आला तर त्यांनी खालील पत्त्यावर तो आणुन दयावा ही विनंती.

ही जाहीर नोटीस दिली असे.
नेवासा
दिनांकः–३०/०१/२०२६
जाहीर नोटीस देणार तर्फे ॲड

**जाहीर नोटीस देणार**
**श्री. सतिष मोतीलाल गांधी**
**रा. नेवासा फाटा, ता. नेवासा,**
**जि.अहिल्यानगर**
**मो.नं. ९०२८९४२१२१**

## पान १ वरुन

### नव्या आर्थिक वर्षात नवा आयकर कायदा बांगलादेशवर 'सर्जिकल स्ट्राईक'

अर्थसंकल्पातून सरकारने कापड उद्योगाला थेट बूस्टत जागतिक टेक्सटाइल मॅपवर भारताला अधिक स्पर्धात्मक बनवण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे. चॅलेंज मोडवर मेगा टेक्सटाइल पार्क, राष्ट्रीय फायबर योजना आणि स्किलिंगपासून निर्यातीपर्यंत संपूर्ण व्हॅल्यू चेन मजबूत करणाऱ्या अनेक योजनांचा यात समावेश आहे. भारताच्या शेजारी असलेला बांगलादेश गेल्या अनेक वर्षांपासून रेडीमेड गारमेंट्समध्ये भारतासाठी मोठे आव्हान ठरला आहे. बांगलादेशची वस्त्रउद्योग व्यवस्था निर्यात-केंद्रित असून, भारताचा फोकस मोठ्या देशांतर्गत बाजारावर राहिला आहे. २०२४ मध्ये बांगलादेशने ५२.९ अब्ज डॉलरचा गारमेंट निर्यात व्यापार केला, तर भारताचा टेक्सटाइल, अपॅरेल आणि हस्तकलेचा एकत्रित निर्यात व्यापार ३७.७ अब्ज डॉलर इतका होता. त्यामुळे गारमेंट निर्यातीमध्ये बांगलादेश भारताच्या पुढे असल्याचे वास्तव आहे. भारताचा उद्देश २०३० पर्यंत गारमेंट आणि टेक्सटाइल निर्यात १०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा आहे. बांगलादेशचा टेक्सटाइल सेक्टर सध्या दबावाखाली आहे. तिथल्या स्पिनिंग मिल मालकांनी १ फेब्रुवारी २०२६ पासून अनिश्चितकालीन संपाचा इशारा दिला आहे. कारण भारतातून येणाऱ्या स्वस्त, ड्युटी-फ्री यार्नमुळे स्थानिक उत्पादन अडचणीत आले आहे. हा बांगलादेश वरील भारताचा सर्जिकल स्ट्राइक मानला जात आहे.

#### असा येणार रुपया...

निगम कर: १८%
उधार आणि दायित्वे: २४%
गैर-कर्ज भांडवली प्राप्ती: २%
गैर-कर महसूल: १०%
जीएसटी आणि इतर कर: १५%
आयकर: २१%
सीमाशुल्क: ४%
केंद्रीय उत्पादन शुल्क: ६%

#### असा जाणार रुपया...

राज्यांचा कर वाटा: २२%
इतर खर्च: ७%
नागरी निवृत्तिवेतन: २%
केंद्रीय क्षेत्र योजना: १७%
प्रमुख अनुदाने: ६%
संरक्षण: ११%
व्याज देय: २०%
वित्त आयोग आणि इतर हस्तांतरण: ७%
केंद्र प्रायोजित योजना: ८%

७ हाय स्पीड रेल्वे कॉरिडॉर : ग्रोथ कनेक्टर्स

अर्थसंकल्पात दिल्ली वाराणसीसह ७ हाय-स्पीड रेल कॉरिडॉरची घोषणा करण्यात आली आहे. बनारस आणि पाटणा येथे जहाज दुरुस्ती सुविधा उभारण्यात येणार आहेत. तसेच दिल्ली वाराणसी आणि वाराणसी सिलिगुडी या मार्गांवरही हाय-स्पीड रेल कॉरिडॉर उभारले जाणार आहेत. ह्या पुढील मार्गांचा समावेश आहे.

* मुंबई ते पुणे
* पुणे ते हैदराबाद
* हैदराबाद ते बंगळुरु
* हैदराबाद ते चेन्नई
* चेन्नई ते बंगळुरु
* दिल्ली ते वाराणसी
* वाराणसी ते सिलिगुडी

बायोफार्मासिटिकल क्षेत्राला चालना

बायोफार्मासिटिकल क्षेत्रासाठी एक मोठी घोषणा करताना अर्थमंत्र्यांनी सांगितलं की, भारताला जागतिक बायोफार्मासिटिकल उत्पादन केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी, मी 'बायोफार्म शक्ती' योजना प्रस्तावित करतो. यामुळे पुढील पाच वर्षांत १०,००० कोटींची तरतूद केली जाईल. यामुळे बायोलॉजिक्स आणि बायोसिमिलरच्या देशांतर्गत उत्पादनासाठी एक मजबूत परिसंस्था तयार होईल. त्याचबरोबर भारताला मेडिकल टुरिझम देश बनवण्यासाठी देशभरात पाच मेडिकल हब उभारणार असल्याचे सांगताना अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कॅन्सर व मधुमेहाची औषध स्वस्त दरात मिळणार, असे जाहीर केले.

#### केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राचा....

करण्यात आल्या आहेत. लखपती दिदी योजनेच्या यशानंतर महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स आणि उद्योगांच्या संधी तयार करण्याची योजना अत्यंत महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्यात उच्च शिक्षण घेणार्या मुलींसाठी वसतीगृहांची योजना तयार करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात आपात चिकित्सा व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आरोग्य क्षेत्रात मोलाचा ठरेल. मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद हायस्पीड कॉरिडॉरमुळे जीडीपीत मोठी वाढ होईल. पुणे-हैदराबाद कॉरिडॉरचा मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्राला मोठा लाभ होईल. ग्रोथहबसाठी ५००० कोटी प्रत्येकी ५ वर्षांत प्राप्त होणार आहेत, याचा लाभ मुंबई महानगर (एमएमआर), पुणे महानगर, नागपूर महानगर ग्रोथहबला होणार आहे, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# ग्लोबलनगरी फाउंडेशनचा 'मेंटर मित्र' उपक्रम ; परदेशातील तज्ज्ञांचा भारतीय विद्यार्थ्यांशी थेट संवाद



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ममदापूर** : ग्लोबलनगरी फाउंडेशन (अमेरिका) यांच्या माध्यमातून परदेशात कार्यरत असलेले भारतीय मूळचे तज्ज्ञ भारतातील विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार असून, शिक्षण, करिअर आणि जागतिक संधींचे नवे दालन उघडणारा उपक्रम लवकरच सुरू होणार आहे. फाउंडेशनच्या 'मेंटर मित्र' या विशेष कार्यक्रमांतर्गत हा ऑनलाइन संवाद उपक्रम राबविण्यात येणार आहे.या उपक्रमाचा उद्देश भारतातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शिक्षण पद्धती, करिअर संधी, संशोधन, स्टार्टअप्स, उद्योजकता आणि आंतरराष्ट्रीय अनुभव याबाबत सखोल मार्गदर्शन करणे हा आहे. विशेष म्हणजे, विविध देशांमध्ये कार्यरत असलेले भारतीय तज्ज्ञ आपल्या वैयक्तिक अनुभवांच्या आधारे विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यातील सहा महाविद्यालयांमधून प्रायोगिक तत्त्वावर हा उपक्रम राबविण्यात येणार असून, त्याची सुरुवात श्रीरामपूर येथील आर. बी. एन. बी. कॉलेज येथून होणार आहे. यानिमित्त मूळचे श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथील रहिवासी व सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेले ग्लोबलनगरी फाउंडेशनचे फाउंडिंग बोर्ड मेंबर व सिनिअर व्हाईस प्रेसिडेंट रोहित काळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी आर. बी. एन. बी. कॉलेज व ग्लोबलनगरी फाउंडेशन यांच्यात समन्वय करारावर स्वाक्षरी करण्यात आली.पुढील आठवड्यात सुरू होणाऱ्या ऑनलाइन संवाद सत्रांमध्ये अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इंग्लंडसह विविध देशांतील उच्च शिक्षण, आयटी, वैद्यकीय, अभियांत्रिकी, संशोधन, व्यवस्थापन व उद्योजकता क्षेत्रात कार्यरत असलेले भारतीय व्यावसायिक सहभागी होणार आहेत. या संवादातून शिष्यवृत्ती, प्रवेश प्रक्रिया, करिअर नियोजन, कौशल्य विकास, आर्थिक नियोजन व परदेशातील सांस्कृतिक बदल याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. संवाद सत्रादरम्यान विद्यार्थ्यांना थेट प्रश्न विचारण्याची संधी मिळणार असून, त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होणार आहे. शैक्षणिक तज्ज्ञांच्या मते, असे उपक्रम ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरणार आहेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने कॉलेजच्या वतीने रोहित काळे यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. प्रवीण बडदे, उपप्राचार्य डॉ. अनुप दळवी, प्राचार्य दिगंबर बनकर, संदीप कवडे, बाळासाहेब शेळके, योगिता रांधवणे, सुनील देवकर आदी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### कलावती पानमळकर



**अहिल्यानगर :** येथील ज्येष्ठ नागरिक कलावती विश्वनाथ पानमळकर (वय ७१) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नागरदेवळे स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. पानमळकर या फुल व्यावसायिक गणेश पानमळकर व शरद पानमळकर यांच्या मातोश्री होत. त्यांच्या मागे पती, दोन मुले, एक मुलगी, जावई, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### गोरक्षनाथ शेटे



**पानेगांव** - नेवासे तालुक्यातील गोणेगांव येथील प्रगतीशिल शेतकरी गोरक्षनाथ दामोधर शेटे (वय ६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,भाऊ एक मुलगा, चार मुली, पुतणे, सुना, जावई,नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. गोणेगांव संस्थेचे माजी अध्यक्ष विठ्ठल शेटे यांचे बंधू, उद्योजक नितीन काळे यांचे मामा होत.

# सर्वसमावेशक व दूरदृष्टीपूर्ण अर्थसंकल्प : आ. अमोल खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर:** महाराष्ट्रातील शेतकरी, तरुण, आरोग्य क्षेत्र आणि उद्योजकांसाठी आश्वासक ठरला असून राज्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा देणारा आहे, अशी प्रतिक्रिया आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली. आज सादर झालेला अर्थसंकल्प हा विकसित भारताच्या दिशेने टाकलेले खंबीर पाऊल आहे. बळीराजाच्या कष्टाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शेती अधिक सक्षम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न या अर्थसंकल्पात दिसतो, असे आमदार खताळ यांनी सांगितले. फलोत्पादन वाढीसाठी नारळ, काजू, चंदन आणि अक्रोड उत्पादनावर भर देण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. कोकणातील नारळ बागायतदारांसाठी 'कोकोनट प्रमोशन स्कीम' आणि प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. तसेच मत्स्योद्योगाची पुरवठा साखळी सशक्त करून मच्छिमारांचे उत्पन्न वाढवण्यावर भर देण्यात आला आहे, असे ते म्हणाले.



शेतीत एआयचा वापर वाढवण्याबाबत बोलताना आमोल खताळ म्हणाले, 'व्हर्च्युअल इंटीग्रेटेड सिस्टम टू एक्सेस ॲग्रीकल्चर रिसोर्स' हे बहुभाषिक एआय टूल विकसित केल्यामुळे शेतकऱ्यांना आधुनिक माहिती सहज उपलब्ध होणार आहे. दुग्धव्यवसाय, कुकुटपालन आणि मत्स्यव्यवसायासाठी दिलेले विशेष अनुदान ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारे आहे.

तरुणांसाठीच्या तरतुदींबाबत त्यांनी सांगितले, १५ हजार माध्यमिक शाळांमध्ये 'कंटेंट क्रिएटर लॅब्स' स्थापन करणे आणि गेमिंग व तत्रज्ञ क्षेत्रात २० लाख युवकांना प्रशिक्षण देण्याचा निर्णय हा भविष्यातील रोजगार संधी लक्षात घेऊन घेतलेला आहे. आरोग्य क्षेत्रात दिलेल्या सवलतींचे स्वागत करताना खताळ म्हणाले, कॅन्सर आणि दुर्मिळ आजारांवरील औषधांवरील कर कमी केल्यामुळे उपचार अधिक परवडणारे होतील. अपघात विमा करमुक्त केल्याने सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. तीन नवीन 'ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ आयुर्वेद'ची स्थापना आरोग्य सुविधांना बळ देणारी ठरेल.

# देवांग कोष्टी समाजाचा गुणवंत कौतुक सोहळा संपन्न





प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : देवांग कोष्टी समाज सेवा मंडळ विद्यार्थी कल्याण प्रतिष्ठानतर्फे आयोजित गुणवंत कौतुक सोहळ्यात वरिष्ठ पत्रकार व सत्यमेव जयते ग्रुपचे संस्थापक विष्णुपंत डावरे यांनी समाजातील प्रामाणिकता व कष्टाच्या महत्त्वावर भर देत सामाजिक कार्याचे आवाहन केले. कोष्टी समाजात जन्म घेतल्याचे भाग्य समजतो, असे सांगत त्यांनी स्व. साने गुरुजी व गुरुजनांच्या प्रेरणेचे श्रेय दिले. समाजाने त्यांचा ११ वेळा सन्मान केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करत, वयाच्या ७० व्या वर्षी या सोहळ्याच्या निरंतरतेसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष सेवानिवृत्त अध्यापक प्रदीप महामुने होते. प्रमुख अतिथी गोकुळ ढुमणे यांच्यासह डावरे उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ. दत्ता पोन्दे म्हणाले, मंडळ गेल्या ४६ वर्षांपासून अविरत गुणवंतांचा सन्मान करत असून, आर्थिक दुर्बल घटकांना मदत करते. यंदापासून इयत्ता १०वी, ११वी, १२वीच्या गरजू विद्यार्थ्यांसाठी विशेष आर्थिक योजना सुरू होत आहे.यावेळी समाजातील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. बारामतीच्या स्वाती संजय खराडे यांना स्व. कमलाबाई बिबवे स्मृती जीवन गौरव पुरस्कार, तर राजगुरुनगरचे उद्योजक दत्तात्रय सुदामराव वाडूकर यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. ७५ वर्षे पूर्ण केलेल्या महिला सदस्यांचाही गौरव झाला. मंडळाचे विश्वस्त शैलेश तरवडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन सुषमा भागवत व निलेश मंचरकर यांनी केले. बाळासाहेब पोन्दे, उदय तरवडे, निखिल लकारे आदींनी कार्यक्रम यशस्वी केला.

# संत शिरोमणी रोहिदास महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : संत शिरोमणी रोहिदास(रविदास)महाराज यांच्या जयंती निमित्त रविवार(०१)रोजी पोटे गल्ली येथील समाज मंदिरात शहरातील सर्व थरातील नागरिकांनी एकत्र येत संत रोहिदास महाराज यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.प्रथम नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी मूर्तीला पुष्पहार अर्पण करून आरती केली.या प्रसंगी माजी नगरसेविका विमलबाई भाऊसाहेब पोटे,सचिन जोशी, श्रावण चौधरी, सोनू राजपूत,शकील कुरेशी, श्री.त्रिभुवन जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत,भाऊसाहेब मापारी,उत्सव समिती अध्यक्ष अजय पोटे,उपाध्यक्ष सुनील पोटे,कार्याध्यक्ष राजेश पोटे,जगन्नाथ पोटे,पंढरीनाथ पोटे ,यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.प्रास्ताविक व संत रोहिदास यांच्या विषयी धोंडीरामसिंह राजपूत यांनी माहिती दिली.या प्रसंगी अविनाश पोटे,अशोक देवरे,उमेश पोटे ज्ञानेश्वर तेलोरे,कचरू घोडके,सुरेश पोटे,शांताराम पोटे, सागर पोटे, सुनील पोटे, ॲड. बारसे, एकनाथ पोटे, पप्पू देवरे, गोरख पोटे, साहेबराव वाघ यांच्यासह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.





संत रविदास महाराज यांना जयंती निमित्त अभिवादन करताना डॉ.दिनेश परदेशी सह उपस्थित नागरिक)

# ग्रामीण अर्थकारणाच्या पायाभूत सुविधा वाढविणारा अर्थसंकल्प : बिपीन कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कोपरगांव** : पंतप्रधान नरेंद्र मोदी व देशाच्याअर्थमंत्री निर्मला सितारामन यांनी ग्रामीण अर्थकारणाला अधिकाधिक चालना मिळून पायाभूत सुविधा वाढविणारा अर्थसंकल्प सादर करून छोटे मोठे उद्योग, शेतकरी कष्टकरी, अल्पभूधारक शेतकरी, महिला आदी वर्गासाठी मोठा दिलासा दिला अशा शब्दात संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे. साखर उद्योगानंतर देशात कापड उद्योग सर्वात मोठा आहे त्यासाठीही धडाडीचे पाऊल अर्थमंत्र्यांनी उचलले आहे असेही ते म्हणाले.

बिपीन कोल्हे पुढे म्हणाले की, सध्या शहरीकरण वेगाने वाढत आहे. त्यातून उद्भवणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी अर्थसंकल्प दिशा देणारा आहे. मधुमेह आणि कर्करोगाचे रुग्ण देशात वाढत आहे त्यांच्या आरोग्य सुविधा सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या बाहेर आहेत यासाठी औषधे स्वस्त करून पाच मेडीकल हबसह तीन आयुर्वेद एम्स हॉस्पीटल उभारण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. ग्रामीण अर्थकारणाचा पाया कृषी उद्योग असुन कृषी उत्पादकता वाढविण्यासाठी या अर्थसंकल्पात विशेष काळजी घेतली आहे. मत्स्य पालनासाठी पाचशे अमृत जलाशय निर्माण करण्यात येणार आहे. कृषी उत्पादनांत कृत्रीम बुद्धिमत्ता ए-आय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला जाणार आहे. खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या धोरणांत भारत जागतीक हब व्हावे यासाठी बायोफार्मा उत्पादन वाडीवर भर देण्याचे सूतोवाच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. नारळ, चंदन काजू लागवडीबरोबरच दुग्धोत्पादन, पशुपालन, कुक्कुटपालन यावरही समाधानकारक पावले अर्थसंकल्पात घेण्यात आली आहे

# स्व. कर्डिले संपर्क कार्यालयात भाजपाकडून अजित पवारांना श्रद्धांजली



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष स्व. अजित पवार यांना भारतीय जनता पक्षाच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. राहुरी येथील स्व. शिवाजीराव कर्डिले यांच्या जनसंपर्क कार्यालयात या शोकसभेचे आयोजन करण्यातआले होते.

याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते प्रकाश पारख, अमोल भनगडे, सतीश फुलसौदर व कांतीलाल जगधने पत्रकार राजेंद्र वाडेकर यांनी स्व. अजित पवार यांच्या राजकीय प्रवासाचा गौरव करून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमास माजी नगरसेवक अक्षय तनपुरे, विक्रम भुजाडी, सचिन मेहेत्रे,सुनील पवार, उमेश शेळके, सुजय काळे, गणेश काशीद, सुनील देशमुख, नारायण झावरे, राजेंद्र दरक, मारुती नालकर, विलास मंडलिक, अप्पासाहेब येवले, शरद किनकर आणि अरुण डौले उपस्थित होते.

# अनिवासी भारतीय व भारतातील रीटेल क्षेत्रातील गुंतवणुकीबाबत अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते : डॉ. धनंजय दातार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : भारतीयअर्थव्यवस्था पुढील दोन-तीन वर्षांतच जगातील तिसरी मोठी अर्थसत्ता बनू शकेल. तशा संधीही आपल्याला चालून आल्या आहेत. ब्रिटन, न्यूझिलंड संयुक्त अरब अमिरात, युरोपीय महासंघ यांच्याशी झालेल्या व्यापारी करारांमुळे निर्यातवाढीत मोठी झेप अपेक्षित आहे. मात्र त्याचवेळी अनिवासी भारतीयांकडून भारतात गुंतवणुकीला प्रोत्साहनाबाबत, तसेच भारतातील रीटेल क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्याबाबत ताज्या अर्थसंकल्पात ठोस उपाय हवे होते, अशी अपेक्षा दुबईस्थित अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्सचे अध्यक्ष व मसालाकिंग डॉ. धनंजय दातार यांनी बोलून दाखवली आहे.

आज जाहीर झालेल्या केंद्रीय अर्थसंकल्पाचे स्वागत करताना ते म्हणाले, भारतीय अर्थव्यवस्थेला प्रचंड ताकद देण्याचे सुप्त सामर्थ्य रीटेल क्षेत्रात आहे, परंतु भारतात एकतर या क्षेत्रात खूप कमी व्यावसायिक आहेत आणि जे आहेत ते उच्च करांच्या दडपणामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सक्षमतेने स्पर्धा करु शकत नाहीत. त्यावर उपाय म्हणून सरकारने हे व्यावसायिक व सर्वसामान्यांवरील करांचे ओझे कमी करावे आणि अनिवासी भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतातील रीटेल क्षेत्रात थेट गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन द्यावे.



ते पुढे म्हणाले, भारतातील प्रचंड लोकसंख्येच्या तुलनेत तसेच रीटेल बाजारपेठही प्रचंड उलाढालीची असताना या क्षेत्रात व्यावसायिकांची संख्या अद्यापही पुरेशी नाही. त्यामुळे भारतीय परदेशात जाऊन व्यवसाय करतात पण देशात मात्र मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होत नाही परदेशांच्या तुलनेत स्थानिक वेतनमानही आकर्षक नसते. यावर उपाय म्हणून सरकारने अनिवासी भारतीय व आंतरराष्ट्रीय व्यवसायांना भारतीय रीटेल क्षेत्रात आकर्षित करुन कर सवलती दिल्यास तसेच परकी थेट गुंतवणुकीस (एफडीआय) प्रोत्साहन दिल्यास येथे नव्या नोकऱ्या आणि प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील, कर्मचाऱ्यांना चांगले वेतनही मिळेल आणि व्यावसायिकांची संख्या वाढल्यास स्पर्धात्मकतेमुळे वस्तूंच्या किंमती कमी होऊन सर्वसामान्यांना वस्तू स्वस्तात मिळतील. अनेक अनिवासी भारतीय जगभरात उत्तम व्यवसाय करतात, पण भारतात गुंतवणुकीस राजी होत नाहीत. हे चित्र बदलणे गरजेचे आहे.

भारतातील रीटेल क्षेत्रात प्रचंड सुप्त सामर्थ्य आहे आणि आगामी काळ भारतासाठी अत्यंत आश्वासक आहे, असे स्पष्ट करताना डॉ. दातार म्हणाले, की काही वर्षांपूर्वी भारत खरेदीदारांची बाजारपेठ (बायर्स मार्केट) होता तो आज विक्रेत्यांची बाजारपेठ (सेलर्स मार्केट) बनला आहे.


CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME ARIF MOHMAD HUSSAIN SHAIKH (NAME AS PER SSC CERTIFICATE) AND ARIF MOHOMODHUSAIN SHAIKH (NAME AS PER DEGREE CERTIFICATE) TO NEW NAME AS ARIF MOHAMADHUSEN SHAIKH VIDE AADHAR NO.6751 2288 8809

CHANGE OF NAME

I HAVE CHANGE MY OLD NAME MOHMAD HUSSAIN AND MOHOMODHUSAIN (FATHERS NAME AS PER SCHOOL DOCUMENTS OF MY SON) TO NEW NAME AS MOHMAD HUSEN ABDUL KARIM SHAIKHVIDE AADHAR NO.8549 8174 5539


## नशिबाची परिक्षा

सोमवार दि. २ फेब्रुवारी २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१२५ २६० ४४० | ८-६ | १२३ २४० २६८ | जोड ८४-१६-५२ ३९-६०

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
१४६ १२८ ११९ | १-० | १९० २८० ४६० | जोड १३-७०-४२ ९५-०८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१४९ २४८ ४४६ | ४-८ | १७० १८९ ११६ | जोड ४१-६८-३९ ५७-८२

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# दखल

## राजयोग मेडिटेशनमुळे मनाला निश्चित शांती मिळते : तराळ

**पारनेर :** धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत मानवाला खऱ्या सुखाचा शोध घ्यायचा असेल, तर अध्यात्म हाच एकमेव मार्ग आहे. प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून शिकवले जाणारे 'राजयोग मेडिटेशन' हे मनाला निश्चितच शांती देणारे असून, विचारांमध्ये सकारात्मकता निर्माण करणारे आहे, असे प्रतिपादन पारनेर तालुका वकील संघटनेच्या माजी उपाध्यक्षा ॲड. भारती तराळ यांनी केले.

पारनेर येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या 'आध्यात्मिक दिनदर्शिका २०२६' च्या लोकार्पण सोहळ्यात त्या बोलत होत्या. यावेळी केंद्र संचालिका ब्रह्मकुमारी साधना दिदी, ज्येष्ठ साधक रामभाई तसेच इतर भाई आणि माताजी उपस्थित होत्या. ॲड. भारती तराळ यांच्या शुभहस्ते नवीन वर्षाच्या आध्यात्मिक दिनदर्शिकेचे लोकार्पण करण्यात आले. ॲड. भारती तराळ म्हणाल्या, वकिलीसारख्या आव्हानात्मक क्षेत्रात काम करताना मानसिक संतुलन राखणे अत्यंत गरजेचे असते. राजयोगाच्या अभ्यासाने मनाची एकाग्रता वाढते आणि कठीण प्रसंगातही संयम राखण्याची शक्ती मिळते. या केंद्राने प्रकाशित केलेली दिनदर्शिका घरोघरी पोहोचल्यास त्यातील सुविचारांमुळे लोकांच्या दैनंदिन आयुष्यात सकारात्मक बदल घडतील. या सोहळ्यासाठी पारनेर परिसरातील अनेक नागरिक आणि ब्रह्मकुमारी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन केंद्राच्या वतीने करण्यात आले.

## माहिती अधिकार पत्रकार संघटनेकडून श्री संत रोहिदास महाराजांची जयंती उत्साहात

**अमरापुर :** शेवगाव तालुक्याच्या वतीने रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी शेवगाव येथील बस स्टॅण्ड चौकात चर्मकार समाजाचे आराध्य दैवत, समाजसुधारक व संतश्रेष्ठ श्री संत रोहिदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त माहिती अधिकार पत्रकार संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी माहिती अधिकार पत्रकार संघटनेचे अध्यक्ष राजाभाऊ तरटे यांनी श्री संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी श्री संत रोहिदास महाराजांचे सामाजिक, आध्यात्मिक व वैचारिक महत्त्व विशद केले. संत रोहिदास महाराजांनी समतेचा, मानवतेचा आणि श्रमप्रतिष्ठेचा संदेश समाजाला दिला. कर्म, भक्ती आणि माणुसकी हाच खरा धर्म असल्याचा संदेश त्यांनी दिला. कार्यक्रमास माहिती अधिकार पत्रकार संघटनेचे सचिव गोरख वाघमारे, सचिन शेजूळ, सचिन भालसिंग, मच्छिंद्र देहाडराय, प्रेम सुख जाजू, गणेश महाजन, बंडू मेहेर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हस्ताक्षर स्पर्धेत विराज सासवडे प्रथम; धोत्रे खुर्द शाळेचे सलग चौथ्या वर्षी यश



**नगर :** पारनेर तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, धोत्रे खुर्द येथील इयत्ता चौथीतील विद्यार्थी विराज सुभाष सासवडे याने अहिल्यानगर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून ऐतिहासिक यश संपादन केले आहे. या यशामुळे धोत्रे खुर्द शाळेची हस्ताक्षर स्पर्धेतील उज्ज्वल परंपरा सलग चौथ्या वर्षी कायम राहिली आहे.
अहिल्यानगर जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. सुंदर अक्षररचना, अक्षरांची सुस्पष्टता, शिस्तबद्ध मांडणी आणि लेखनातील सातत्य या सर्व निकषांवर विराजच्या हस्ताक्षराने परीक्षकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आणि त्याला प्रथम क्रमांकाचा मान मिळाला.

## ओवी लोखंडे गायन स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम



**लिंपणगाव :** शिक्षण विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत पी. एम. श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्रीगोंदा (मुली) येथील ओवी लोखंडे हिने आपल्या सुमधुर गायनाने परीक्षकांची मने जिंकत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशस्वी सादरीकरणासाठी तिला हार्मोनियमवादक संकेत दरेकर व तबला वादक मयूर पेडगावकर यांची उत्कृष्ट संगीत साथ लाभली. तसेच या स्पर्धेसाठी तिला वर्गशिक्षिका जयश्री शिंदे-रासकर, मुख्याध्यापिका कमल औटी तसेच स्वर-ताल संगीत विद्यालयाच्या रूपाली दरेकर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.
या दैदिप्यमान यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ यांच्यासह अनेक मान्यवरांनी ओवीचे अभिनंदन केले.

# अजितदादांच्या आठवणीने श्रीगोंदा हेलावले

## राजेंद्र नागवडेंनी जागवल्या विकासपर्वाच्या आठवणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आधारस्तंभ अजितदादा पवार यांच्या निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्र पोरका झाला असून, त्यांच्याबद्दलचा आदर आणि प्रेम काल श्रीगोंदा येथे जनसमुदायाच्या डोळ्यांतून ओसांडून वाहत होते. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात श्रीगोंदा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी तालुक्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अजितदादा प्रेमींनी आपल्या लाडक्या नेत्याला साश्रू नयनांनी श्रद्धांजली वाहिली.



या शोकसभेत सहकारमहर्षी शिवाजीराव नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे यांच्या भावनांनी उपस्थितांना गहिवरून टाकले.राजेंद्रदादा म्हणाले

अजितदादा म्हणजे शब्दाचे पक्के आणि कर्तृत्वाचे धनी होते. नागवडे कारखाना असो किंवा तालुक्याचा विकास, त्यांनी नेहमीच कुटुंबातील सदस्याप्रमाणे आम्हाला साथ दिली. सत्तेत असो वा नसो, दादांशी असलेले आमचे ऋणानुबंध हे केवळ राजकीय नव्हते तर ते रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट होते. आज दादांचे जाणे हे वैयक्तिकरीत्या माझे आणि सहकार क्षेत्राचे मोठे नुकसान आहे. तर अनुराधा नागवडे यांनी आपल्या मनोगतात बोलताना म्हणाल्या दादांकडे पाहिल्यावर कामाचा उत्साह द्विगुणित व्हायचा.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि जिल्हा बँकेच्या प्रश्नांवर त्यांनी नेहमीच सकारात्मक मार्ग दाखवला. कामाच्या गडबडीतही प्रत्येक कार्यकर्त्याची विचारपूस करण्याची त्यांची पद्धत मनाला स्पर्शून जाणारी होती. अशा भावना व्यक्त केल्या

तर माजी आमदार राहुल दादा जगताप म्हणाले दादांच्या शिस्तीचा आणि त्यांच्या कामाच्या वेगाचा आम्हा सर्वांवर मोठा प्रभाव होता. उपस्थितांमध्ये नागवडे कारखान्याचे उपाध्यक्ष मेघाताई संदीप औटी , सर्व संचालक तसेच दिग्विजय नागवडे ,बाळासाहेब गिरमकर हरिदास शिर्के व सर्व संचालक मंडळ, प्राचार्य डॉ. सतिशचंद्र सूर्यवंशी, रामदास झेंडे सर नगरसेवक ॲड. सुमित शिंदे, ज्योतीताई खेडकर टिळक भोस, स्मितल वाबळे ,यांच्यासह श्रीगोंदा नगरपालिकेचे नगरसेवक आणि तालुक्यातील मोठ्या संख्येने अजितदादा प्रेमी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत अजितदादांना श्रद्धांजली वाहिली. तालुक्यावर नेहमीच माया करणाऱ्या नेत्याची ही शोकसभा श्रीगोंदेकरांच्या कायम लक्षात राहील.

**श्रीगोंदा तालुक्याच्या सिंचनाचा प्रश्न असो किंवा इतर विकासकामे, दादांच्या शब्दावर ती मार्गी लागली. आज दादा आपल्यात नाहीत, हे पचवणे कठीण आहे.यावेळी घनश्याम आण्णा शेलार, महाराष्ट्र पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, बाजार समिती महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब नाहटा यांनीही दादांच्या आठवणींना उजाळा दिला. राष्ट्रवादी तालुक्याचे अध्यक्ष भगवानराव पाचपुते, ज्येष्ठ नेते अण्णा शेलार, जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप, दीपक पाटील भोसले यांनी दादांच्या कार्यकर्तृत्वाला उजाळा दिला.**

## तोतया पोलीस अधिकाऱ्यांकडून व्यावसायिकाला खंडणीची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** पोलीस अधिकारी असल्याचे भासवून एका व्यावसायिकाला खोट्या गुन्ह्याची भीती दाखवत ५ लाख रुपयांची खंडणी मागणाऱ्या अज्ञात भामट्यांविरुद्ध अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी विनीत नानासाहेब जाधव (वय ३८, रा. सावेडी, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादी विनीत जाधव यांना २९ जुलै २०२५ ते ३० जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत दोन वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरून वारंवार फोन येत होते. समोरून बोलणार्या व्यक्तीने आपण पोलीस अधिकारी असल्याचे भासवले आणि जाधव यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. हा खोटा गुन्हा टाळण्यासाठी संशयित आरोपींनी त्यांच्याकडे ५ लाख रुपयांच्या खंडणीची मागणी केली.सततच्या धमक्यांमुळे घाबरलेल्या जाधव यांनी अखेर सायबर पोलिसांकडे धाव घेत फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी दोन मोबाईल क्रमांकधारक अनोळखी व्यक्तींसह त्यांच्या इतर अज्ञात साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले अधिक तपास करीत आहेत

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पाचही आरोपी निर्दोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर :** अहमदनगर शहरातील विद्या कॉलनी, आदर्शनगर, कल्याण रोड येथील एका फ्लॅटमध्ये विवाहित महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याच्या प्रकरणात पतीसह पाच जणांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. ही घटना दि. २६ सप्टेंबर २०१६ रोजी घडली. या प्रकरणाची सुनावणी जिल्हा न्यायालयात पूर्ण होऊन न्यायालयाने सर्व पाचही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.

या प्रकरणातील मयत महिलेचा विवाह सन २०१० मध्ये पांडुरंग घनःश्याम बडे यांच्याशी झाला होता. विवाहानंतर सासरच्या मंडळींकडून फ्लॅट खरेदीसाठी माहेरहून दहा लाख रुपये आणण्याचा तगादा लावून शारीरिक व मानसिक छळ करण्यात आला, असा आरोप मयत महिलेच्या वडिलांनी फिर्यादीत केला होता. या आधारे कोतवाली पोलिसांनी पती पांडुरंग बडे, सासू यमुनाबाई बडे, सासरे घनःश्याम बडे, दिर परमेश्वर बडे व नणंद आशाबाई बडे यांच्याविरोधात भा.दं.वि. कलम ३०६, ४९८-अ व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला होता. खटल्याच्या सुनावणीदरम्यान आरोपींकडून सविस्तर बचाव मांडण्यात आला. आरोपी क्रमांक एक पांडुरंग बडे हे प्रादेशिक परिवहन कार्यालयात कार्यरत असून, २०१३ मध्ये त्यांची नागपूर येथे बदली झाली होती. त्या काळात पत्नी व मुलासोबत ते नागपूर येथे राहत होते. फिर्यादीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन आरोपीने त्यांना वेळोवेळी आर्थिक मदत केल्याचे न्यायालयात नमूद करण्यात आले. एकदा पन्नास हजार रुपये ऑनलाइन पाठविल्याचाही उल्लेख करण्यात आला. तसेच, नंतर बदली श्रीरामपूर येथे झाल्यानंतर मुलाच्या शिक्षणासाठी पत्नी व मुलाला नगर येथे ठेवण्यात आले होते. पत्नी श्रीरामपूर येथे येण्यासाठी आग्रह करत होती; मात्र नगरमध्ये शिक्षण चांगले असल्याने तिला तिथेच ठेवण्यात आले. या कारणावरून झालेल्या कौटुंबिक मतभेदांमुळे आत्महत्या झाली असावी, असा बचाव करण्यात आला. पैशांची कोणतीही मागणी करण्यात आली नसल्याचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरला.

दोन्ही बाजूंचे पुरावे व युक्तिवाद तपासून जिल्हा न्यायालयाने पाचही आरोपींना दोषमुक्त केले. आरोपींच्या वतीने ॲड. सतीशचंद्र सुद्रीक यांनी काम पाहिले.

# 'आम्ही कॉपी करणार नाही' विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** आम्ही कॉपी करणार नाही आणि कुणाला कॉपी करण्यास प्रवृत्त करणार नाही असे म्हणत ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी दादा पाटील महाविद्यालयाच्या शारदाबाई पवार सभागृहात नुकतीच बारावी बोर्ड कॉपीमुक्त परीक्षा अभियान अंतर्गत शपथ घेतली.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. संजय नगरकर म्हणाले की, दोन वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अभ्यासाच्या बळावर व दादा पाटील महाविद्यालयात सातत्याने बारावी बोर्डाच्या परीक्षेच्या अनुषंगाने केले जाणारे मार्गदर्शन याच्या आधारे विद्यार्थ्यांनी वेळेचे नियोजन, शास्त्रशुद्ध अभ्यास पद्धती व सूक्ष्म वाचन, चिंतन आणि मनन या त्रिसूत्रीचा वापर करून आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जावे.

दोन वर्षांपासून मिश्र परीक्षा पद्धती व सीसीटीव्हीचा अनिवार्य वापर यामुळे कॉपी करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसण्यास म दत होत आहे. महाविद्यालयात सातत्याने या पद्धतीचा वापर केल्यामुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षेविषयी कोणतीही भीती न बाळगता परीक्षेला सामोरे जावे असे आवाहन केले.



कला, वाणिज्य, विज्ञान तसेच एम सीव्हीसी या विविध शाखातील सर्व विद्यार्थी तसेच राम इंगळे, भागवत देशमुख, बाजीराव डहाळे, बापू उदमले पालक देखील उपस्थित होते. पालकांच्या वतीने जयश्री धांडे यांनी म नोगत व्यक्त केले व दादा पाटील महाविद्यालय सातत्याने विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या गुणात्मक विकासासाठी राबवित असलेल्या उपक्रम ांविषयी समाधान व्यक्त केले.

याप्रसंगी त्रिवेणी कानगुडे, सोनम शिंदे, शुभम गवळी, अंजली गुळवे, त्रिवेणी पागिरे या विद्यार्थिनींनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम ाचे प्रास्ताविक विज्ञान शाखाप्रमुख प्रा. जयदीप खेतमाळीस तर आभार प्रा. प्रवीण घालमे यांनी मानले.

सूत्रसंचालन प्रा.किरण भोसले व प्रा. सुलभा पवार यांनी केले व विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त परीक्षा अभियानाची शपथ प्रा. राजेश दळवी यांनी दिली.



## अजितदादांच्या निधनाने न भरून येणारी मोठी पोकळी : ॲड. कृष्णा झावरे

**नगर :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेते आदरणीय अजितदादा पवार यांच्या दुःखद निधनाने राज्याच्या राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रात कधीही न भरून येणारी मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे भावनिक उद्गार अहिल्यानगर न्यायालय वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. कृष्णा झावरे पाटील यांनी काढले. अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अहिल्यानगर न्यायालय परिसरात वकील संघटनेच्या वतीने श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले होते.

या शोकसभेस संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, सचिव ॲड. विनोद शेटे, सहसचिव अमोल अकोलकर, कार्यकारिणी सदस्य ॲड. प्राजक्ता करांडे यांच्यासह न्यायालयातील ज्येष्ठ व तरुण वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी उपस्थितांनी दोन मिनिटांचे मौन पाळून अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी ॲड. अनुराधा येवले, गौरव दांगट, राजेश कातोरे, संतोष वाळुंज, युवराज पाटील, शरद जाधव, एन. के. गर्जे, सतीश गुगळे, रफिक बेग, सतीशचंद्र सुद्रिक आदी वकिलांनी मनोगत व्यक्त करून अजितदादांच्या कार्याची आठवण करून दिली. सभागृहात शोकाकुल वातावरण असून उपस्थित सर्वजण अजितदादांच्या आठवणींनी भावूक झाले होते.

# पटसंख्या अवघी १७, पण लोकसहभागाची ताकद मोठी!

## जिल्हा परिषद शाळेसाठी १.४१ लाखांचा निधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** अवघी १७ विद्यार्थी पटसंख्या असलेल्या बक्तरपुर येथील जिल्हा परिषद मराठी शाळेसाठी ग्रामस्थांनी दाखवलेली एकजूट सध्या सर्वत्र चर्चेचा विषय ठरत आहे. मराठी शाळा टिकवण्यासाठी आणि तिच्या सर्वांगीण विकासासाठी गावकऱ्यांनी लोकसहभागातून तब्बल १ लाख ४१ हजार रुपयांचा निधी उभारून प्रेरणादायी उदाहरण घालून दिले आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेत आयोजित कार्यक्रमात चिमुकल्यांनी सादर केलेली धडाकेबाज मराठी, हिंदी व इंग्रजी भाषणे, संगीत कवायत तसेच लयबद्ध आणि मोहक देशभक्तीपर सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थित ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले. कमी पटसंख्येमुळे अडचणीत आलेली शाळा आता सकारात्मक बदलाच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे या कार्यक्रमातून स्पष्ट झाले.

चार महिन्यांपूर्वी नव्याने रुजू झालेले शिक्षक दांपत्य शाळेच्या परिसर स्वच्छतेपासून ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी झपाटून काम करत आहे. मराठी शिक्षणासोबतच पालकांचा इंग्रजी शिक्षणाकडे असलेला कल लक्षात घेऊन इंग्रजी वाचन व बोलण्यावरही भर देण्यात येत असून, विद्यार्थ्यांच्या प्रगतीतून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. त्यामुळे गावात माझी शाळा – मराठी शाळा असे उत्साहवर्धक वातावरण निर्माण झाले आहे.

कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी गावातील निवृत्त शिक्षक मच्छिंद्र ढोले सर व राहुलदादा बेडके यांनी शाळा विकासासाठी निधी उभारणीचे आवाहन केले. त्यांनी स्वतः पुढाकार घेत देणगी जाहीर करताच ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बाळासाहेब सामृत, हरी बलभीम मिर्झे, सोपान शिवाजी सामृत, परमेश्वर बलभीम मिर्झे, आसाराम सामृत, बाबासाहेब ढोले सर, पंढरीनाथ चापे, विकास फाटके, अर्जुनराव बडे, खासेराव सामृत, विक्रमराव सामृत, राजेंद्रभाऊ फाटके, बाबासाहेब फाटके, आरोग्यसेवक डॉ. कोलते, आसाराम तात्याबा फाटके, नवनाथ फाटके आदी ग्रामस्थांच्या सहकार्याने शाळा विकासासाठी एकूण १ लाख ४१ हजार रुपयांचा निधी उभा राहिला.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक अंकुश गवळी यांनी केले, तर शारदा काकडे (गवळी) मॅडम यांनी आभार प्रदर्शन केले. बक्तरपुर ग्रामस्थांनी दाखवलेली ही एकजूट मराठी शाळा वाचवण्याच्या चळवळीला नवी दिशा देणारी ठरत आहे.



द•ख•ल

# पुरंदर तालुक्यात विश्वकर्मा जयंती निमित्त कार्यक्रम

**नाझरे सुपे :** ''प्रभू विश्वकर्मा महाराज की जय'' चा जयघोष, टाळ – मृदुंगाचा गजर, प्रतिमेची महापूजा, महाआरती, भाविकांकडून मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली पुष्पवृष्टी, या सोहळ्यासाठी मंदिरात



फुलांची सजावट, समाज बांधवांची उपस्थिती तसेच उपस्थितांना महाप्रसाद देवून विश्वकर्मा महाराज यांची जयंती विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरी करण्यात आली. संत सोपानदेव मंदिरात विश्वकर्मा वंशीय समाज संघटनेच्या वतीने प्रभू वतीने विश्वकर्मा महाराज यांच्या जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त सकाळी १०. वा. संत सोपानदेव महाराज यांच्या पादुका आणि समाधीची अभिषेक घालण्यात येवून महापूजा करण्यात आली. तसेच विश्वकर्मा महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर सामुहिक आरती घेवून विश्वकर्मा महाराज यांच्या प्रतिमेवर पुष्पवृष्टी करण्यात आली. तसेच यानिमित्त टाळ मृदुंगाच्या गजरात संगीत भजन पार पडले. त्यानंतर उपस्थितांना महाप्रसाद देवून जयंती सोहळ्याची मोठ्या उत्साहात सांगता करण्यात आली.

# श्री वाघजाई देवी माघ पौर्णिमा यात्रा उत्साहात

**भोर:** भोरची ग्रामदेवता श्री वाघजाई देवी मंदिराचा १० वा वर्धापनदिन आणि माघ पौर्णिमा यात्रा उत्साहात पार पडली.कलशारोहण वर्धापनदिन दिन निमित्याने सकाळी महाभिषेक ,महाआरती व इतर



धार्मिक कार्यक्रमासह संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष जगन्नाथ भेलके पाटील यांनी सांगितले. आज (दि. १) माघ पौर्णिमा यात्रेच्या निमित्ताने सकाळी सहा वाजता महाअभिषेक महापूजा,महाआरती होऊन सकाळी ९ वाजता भोरेश्वर मंदिर येथून सवाद्य काठी, पालखी मिरवणूक काढण्यात आली. शहरातून राजवाडा – मंगळवार पेठ – वेताळ पेठ वाघजाई नगर या मार्गावर देवीची काठी पालखी दर्शन घेण्यासाठी भाविकांनी गर्दी केल्याचे पहावयास मिळाली. यावेळी उपाध्यक्ष यशवंत डाळ ,सचिव जगन्नाथ मारुती भेलके पाटील, व्यवस्थापक लक्ष्मण राऊत , विश्वस्त गणेश बांदल , यशवंत भेलके, डॉ. उदय पेंडसे ,निवृत्ती किवळे, रविंद्र कोंढाळकर,सागर शेटे,सचिन तारु,शैलेश कांबळे, केशव पवळे, बलदेव बांदल,रविराज भेलके आदी विश्वस्त उपस्थित होते.

# शिक्रापूर पोलिसांचे तीन दारु अड्ड्यांवर छापे

**तळेगाव ढमढेरे :** शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तळेगाव न्हावरा रोड तसेच सणसवाडी येथे पोलिसांनी तीन दारु अड्ड्यांवर छापे टाकत कारवाई करत दारु साठा जप्त करत सुमन सुब्रमण्यम मन्नावत, योगेश सुभाष बडगुजर व निखील महादमेव शिवरकर या तिघांवर गुन्हे दाखल केले आहे. तळेगाव न्हावरा रोड येथे हॉटेल तिरंगा शेजारुन गावठी दारु विकणाऱ्या सुमन मन्नावत व हॉटेल आईसाहेब येथून निखील शिवरकर या दोघांना तर सणसवाडी येथील हरगुडे कॉम्प्लेक्सच्या मागे पोलीस पथकाने छापा टाकत निखील शिवरकर याला दारू साठ्यासह ताब्यात घेतले. याबाबत गुन्हे दाखल केले असून पुढील तपास पोलीस करत आहे.

# गांजा विक्री करणारा आरोपी रंगेहाथ जेरबंद

## १.९८९ किलो गांजा जप्त



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** अंमली पदार्थ विरोधी विशेष मोहिमेअंतर्गत बारामती शहर पोलीस स्टेशनने उत्कृष्ट नियोजन, धाडस व तत्परता दाखवत गांजा विक्री करणाऱ्या आरोपीस रंगेहाथ पकडून मोठे यश संपादन केले आहे. या प्रकरणी फरहान युसुफ शेख, (वय २३ वर्षे), (रा. खेड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) याला अटक करण्यात आली आहे. या प्रभावी कारवाईमुळे बारामती शहर पोलीस स्टेशनची प्रतिमा अधिक उज्वल झाली असून अंमली पदार्थ विक्रेत्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत (दि :२७) बोके हॉस्पिटलजवळील नवीन रिंग रोड परिसरात एक इसम गांजा विक्रीसाठी येणार असल्याची अचूक व विश्वासार्ह गोपनीय माहिती पोलीस उपनिरीक्षक रत्नदिप भंडारे यांना प्राप्त झाली. सदर माहिती तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळविण्यात आली. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड, पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक रत्नदिप भंडारे यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. सदर कारवाईत सहभागी पोलीस अधिकारी व कर्मचारी पो. हवा. सुलतान डांगे, पो.हवा. रामचंद्र शिंदे, पो.कॉ. वैभव मदने, पो.कॉ. राहुल बडे, पो.कॉ. गिरीश नेवसे, पो.कॉ. सागर जामदार, पो.कॉ. अक्षय सीताप, पोलीस पथकाने पंच, वजनकाटा धारक व फोटोग्राफर यांना सोबत घेऊन अत्यंत गोपनीयतेने सापळा रचला. रात्री सुमारे ११:५ मिनिटांनी संशयित इसम मोटारसायकलवर येताना दिसताच पोलिसांनी तत्काळ हालचाल करून त्यास पळून जाण्याची संधी न देता रिंग रोडवरच रंगेहाथ पकडले.

चौकशीअंती आरोपीचे नाव फरहान युसुफ शेख, (वय २३ वर्षे), (रा. खेड, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) असे निष्पन्न झाले. त्याच्याकडून १ किलो ९८९ ग्रॅम वजनाचा गांजा, अंदाजे किंमत रुपये ३९ हजार ७८० हिरो स्प्लेंडर मोटारसायकल (एम एच १६/डीडी/६३७४), अंदाजे किंमत रुपये५० हजार असा मुद्देमाल एन डी पी एस ॲक्ट मधील सर्व कायदेशीर तरतुदींचे काटेकोर पालन करून पंचांसमक्ष जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एन डी पी एस ॲक्ट कलम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास बारामती शहर पोलीस स्टेशनमार्फत सुरू आहे.

''बारामती शहर पोलीस स्टेशनकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अंमली पदार्थ विक्री, साठवणूक किंवा वाहतूक याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल.
तरुण पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवण्यासाठी पोलीस व नागरिक यांचे सहकार्य अत्यावश्यक आहे. बारामती शहर पोलीस स्टेशन अंमली पदार्थांवर झिरो टॉलरन्स धोरण अवलंबत असून, अशा कठोर कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहतील, असे पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# ग्रामगुरू सतीश कुलकर्णी यांचे आळंदीत निधन



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** दि.२९ जानेवारी काष्टी गावचे ग्रामपुरोहित व ग्राम उपाध्य सतिश कुलकर्णी यांचे आळंदी येथे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. आळंदी येथे माऊलींचे दर्शन घेत असताना मंदिर परिसरातच त्यांची प्राज्योत मालवली. ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि काष्टी गावावर शोककळा पसरली.

सतिश कुलकर्णी हे ग्रामपुरोहित मंदार काका कुलकर्णी यांचे वडील होत. परंपरा, संस्कार आणि सेवाभाव या तिन्हींचा संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसत असे. गावच्या धार्मिक, सामाजिक विधींमध्ये त्यांचा सहभाग म्हणजेच विश्वासाची हमी होती.

जुन्या पद्धतीने, शिस्तीत आणि श्रद्धेने त्यांनी आपली सेवा अखेरपर्यंत निभावली. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, दोन पुतणे व नातवंडांसह मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने काष्टी गावात हळहळ व्यक्त होत असून प्रत्येक घरातून एकच शब्द ऐकू येतोकाका नव्हते, तर आधार नव्हता.त्यांचा दशक्रिया विधी दि. ७फेब्रुवारी रोजी सकाळी ८.०० वाजता काष्टी येथील घोड नदी तीरावर होणार आहे.

माणूस जातो, संस्कार राहतात. सतिश काकांनी दिलेला सेवाभावाचा वारसा काष्टी गाव कायम जपेल हीच त्यांच्या स्मृतींना खरी श्रद्धांजली. असेही जनमानसातून बोलले जात आहे.

# जि. प. कर्मचारी सोसायटीच्या चेअरमनपदी संजय कडूस

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर -** जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्या चेअरमनपदी संजय सुदाम कडूस व व्हाईस चेअरमनपदी अर्जुन दिगंबर मंडलिक यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

संस्थेच्या नूतन पदाधिकारी निवडीसाठी संचालक मंडळची सभा शनिवारी संस्थेच्या कार्यालयात जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अध्यासी अधिकारी किरण आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेत चेअरमन पदासाठी संजय कडूस यांच्या नावाची सूचना संचालक प्रशांत मोरे यांनी मांडली. सदर सूचनेस कैलास डावरे यांनी अनुमोदन दिले. व्हा. चेअरमन पदासाठी अर्जुन मंडलिक यांच्या नावाची सूचना भाऊसाहेब चांदणे यांनी मांडली. सदर सूचनेस दिलीप डांगे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर दोन्ही पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड झाल्याचे अध्यासी अधिकाऱ्यांनी जाहीर केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.



संजय कडूस



अर्जुन मंडलिक

या प्रसंगी नूतन चेअरमन संजय कडूस म्हणाले की जय श्री गणेश पॅनलने निवडणुकीच्या वेळी सभासदाना दिलेल्या आश्वासनाची १०० टक्के पूर्तता करण्याचे काम हे संचालक मंडळ करत आहे. व्हा. चेअरमन अर्जुन मंडलिक यांनी सर्व सहकारी संचालकांचे आभार मानून सभासदांच्या हिताचे निर्णय घेवू असे सांगितले.

सदर प्रसंगी संस्थेच्या मावळत्या चेअरमन सुरेखा महारनुर, मावळते व्हा. चेअरमन श्रीकांत देशमाने, संचालक विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, राजू दिघे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, ज्योती पवार, कल्याण मुटकुळे, सुधीर खेडकर, काशिनाथ नरोडे, योगेंद्र पालवे, मनिषा साळवे, अभिजित पवार, चेतन चव्हाण, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे, संस्थेचे सभासद सुजाता भांडवलकर व कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते.

## उपमुख्यमंत्री अजितदादा यांना पारनेरमध्ये आज सर्वपक्षीय श्रद्धांजली



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ पारनेर तालुक्यातील सर्वसामान्य जनतेचा आधारवड, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली सर्वपक्षीय शोकसभा काही अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आली असून ही शोकसभा उद्या रविवार, दिनांक ०१ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार होती. मात्र, काही अपरिहार्य कारणांमुळे आता ही शोकसभा सोमवार, दिनांक ०२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता जिल्हा बँक सभागृह, पारनेर येथेच आयोजित करण्यात आली आलेची माहिती आ. काशिनाथ दाते यांनी सांगितले. या शोकसभेसाठी पारनेर तालुक्यातील सर्व पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी, असे आवाहन आमदार काशिनाथ दाते यांनी केले आहे. तालुक्याच्या राजकीय, सामाजिक व विकासात्मक वाटचालीत अजितदादा पवार यांचे योगदान अविस्मरणीय असून, त्यांच्या स्मृतीस आदरांजली वाहण्यासाठी ही सर्वपक्षीय शोकसभा आयोजित करण्यात आली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# शब- ए – बारातचे श्रीरामपूरात उद्या आयोजन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** इस्लामी नववर्षातील तीन महत्वाच्या रात्रींपैकी अत्यंत महत्वाची दुसरी येणारी शब- ए – बारात ही शाबान या उर्दू महिन्याच्या १४ तारखेच्या संध्येला दरवर्षी साजरी केली जाते. मंगळवार दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री शहर आणि तालुक्यातील गावागावात साजरी केली जाणार आहे. मशिदीतील ईशा नमाजनंतर सर्व मुस्लीम या रात्री कब्रस्थानात (दफनभूमी) जावून तेथे पैगंबरवासी झालेल्या आपापल्या पूर्वजांसाठी प्रार्थना करतात. या दिवशी पूर्वजांसाठी दुवा केली जाते. इस्लाम नववर्षात सलग एकापाठोपाठ दर महिन्याने येणा-या शब- ए – मेराज , शब- ए – बारात आणि शब- ए – कद्र या तिन्ही रात्रीचे एक वेगळेच वैशिष्टय आहे. मुस्लीम बांधव मोठ्या संखेने मशिदीत एकत्र येऊन ही नमाज पठण करतात.

आपापल्या नियोजनांनुसार प्रत्येकाने वेळेवर नमाज अदा करावी, असे आवाहन मुजफ्फर शेख, मदिना मशिदीचे नजीर मुलानी, हाफेज जहुरअली, हाजी मुख्तार शहा, पत्रकार शफीक बागवान यांनी केले आहे.

# माऊली प्रतिष्ठानच्या क्रिकेट स्पर्धेत परफेक्ट मोटर्स संघाचा दणदणीत विजय

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव :** माऊली प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या २ दिवसीय भव्य क्रिकेट स्पर्धेत परफेक्ट मोटर्स संघाने उत्कृष्ट सांघिक खेळाच्या जोरावर विजेतेपद पटकावले. अंतिम सामन्यात परफेक्ट मोटर्स संघाने रामवाडी वैजापूर संघावर वर्चस्व गाजवत चुरशीच्या लढतीत विजय मिळवला. या संपूर्ण स्पर्धेत परफेक्ट मोटर्स संघाचा खेळ कौतुकास्पद ठरला. फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर संघाने सातत्यपूर्ण कामगिरी केली.



स्पर्धेचा प्लेअर ऑफ द सिरिज पुरस्कार परफेक्ट मोटर्स संघाचा अष्टपैलू खेळाडू सोनू खंडागळे याने पटकावला. सोनूने संपूर्ण स्पर्धेत जबरदस्त फलंदाजी करत महत्त्वाच्या क्षणी संघाला विजय मिळवून दिला. त्याचबरोबर त्याच्या प्रभावी गोलंदाजीनेही अनेक सामने परफेक्ट मोटर्सच्या बाजूने वळवले. त्याची खेळातील सातत्य, आत्मविश्वास आणि जिंकण्याची जिद्द सर्वांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरली.

या विजयी संघामागे परफेक्ट मोटर्स संघाचे मालक नाजीम शेख यांचे मार्गदर्शन लाभले. संघातील प्रत्येक खेळाडूला प्रोत्साहन देत त्यांनी खेळाडूंमध्ये आत्मविश्वास निर्माण केला.

यावेळी सूर्या प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आकाश सूर्यवंशी यांनीही आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, भविष्यात गावातील स्थानिक खेळाडूंना सोबत घेऊन अशाच अधिकाधिक क्रिकेट स्पर्धा आयोजित करून गावातील खेळाडूंना व्यासपीठ देणार असून, खेळाच्या माध्यमातून आपल्या गावाचे नाव मोठे करण्याचा आमचा संकल्प आहे. त्यांच्या या घोषणेमुळे उपस्थित खेळाडू व क्रिकेट प्रेमींमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, येणाऱ्या काळात आणखी भव्य स्पर्धांची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुख्य सचिवांनी घेतला नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचा आढावा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी शनिवारी सकाळी १० ते दुपारी १२.३० या वेळेत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रण कार्यालयाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी कार्यालयाच्या प्रशासकीय, तांत्रिक तसेच नागरिक सेवा विषयक विविध बाबींची माहिती त्यांनी घेतली.



या आढावा बैठकीदरम्यान नोंदणी व मुद्रांक विभागामार्फत नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा, दस्तऐवज नोंदणीची प्रक्रिया, संगणकीकरण, ऑनलाईन सुविधा तसेच तक्रार निवारण यंत्रणा याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व कालबद्ध करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा राबविण्याच्या दृष्टीने मुख्य सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

यानंतर मुख्य सचिवांनी नव्या प्रशासकीय इमारतीच्या शेजारी उभारण्यात येत असलेल्या नोंदणी भवनाची पाहणी केली. या इमारतीच्या बांधकामाची सद्यस्थिती, उपलब्ध होणाऱ्या सुविधा, कार्यालयीन जागेचे नियोजन, नागरिकांसाठी प्रतिक्षालय, पार्किंग व्यवस्था तसेच आधुनिक पायाभूत सुविधांबाबत त्यांनी माहिती घेतली. बांधकामाचे काम नियोजित कालमर्यादेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या आढावा बैठकीस राज्याचे जमाबंदी आयुक्त सुहास दिवसे, राज्याचे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे, सह नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक राजेंद्र मुठे यांच्यासह नोंदणी व मुद्रांक नियंत्रण कार्यालयातील सर्व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान विभागाच्या कामकाजातील अडचणी, भविष्यातील गरजा तसेच सुधारणा योजनांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

## नाथ म्हस्कोबांच्या वीर येथील

# कोडीतच्या पालखीचे उत्साहात प्रस्थान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** नाथ साहेबांचं चांगभलं, सवाई सर्जाचं चांगभलं च्या जयजयकारात, हजारोंच्या संख्येने उपस्थित नाथ भक्तांच्या साक्षीने पुरंदर तालुक्यातील श्री क्षेत्र कोडीत येथील श्री नाथ म्हस्कोबांच्या पालखीने आज (रविवारी) दुपारी साडे बारा वाजता श्री क्षेत्र वीरकडे प्रस्थान ठेवले. आज रात्री वीर येथे होत असलेल्या श्री नाथ म्हस्कोबा व देवी जोगेश्वरी यांच्या शाही विवाह सोहळ्याने माघ शुद्ध पौर्णिमा म्हणजेच १ फेब्रुवारी ते माघ शुद्ध दशमी म्हणजेच १२ फेब्रुवारी पर्यंत साजऱ्या होणाऱ्या वीर यात्रेला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला आहे.

दरम्यान काल (शनिवारी) कोडीतच्या नाथ म्हस्कोबा मंदिरातून ढोल ताशांच्या गजरात, नाथांचा जयजयकार करत मानाची पालखी भक्त तुळाजी मंदिरात मुक्कामास दाखल झाली. आज सकाळी पुजा अर्चा, आरती व अन्य धार्मिक विधी पार पडल्यानंतर श्रींना पुरणपोळीचा नैवैद्य दाखवण्यात आला. दुपारच्या सुमारास बडधे, जरांडे, औचरे, राजीवडे, सोनवणे, कांबळे, जाधव भोसले,खोमणे अहिरकर व अन्य मानकरी व हजारो नाथ भक्तांच्या उपस्थितीत साडे बारा वाजता पालखीचे शाही प्रस्थान झाले कोडीत ते वीर या पालखी मार्गावर पायी प्रवास करणाऱ्या भाविकांची संख्या यावर्षी लक्षणीय वाढली आहे. यावर्षीही भाविकांना उन्हाचा तडाखा सहन करावा लागला. वाटेत जागोजागी विविध सामाजिक संघटना व राजकीय पक्षांनी वडा पाव, सरबत, आईस्क्रीम, पाणी याचे वाटप ठेवले होते. सगळ्या रस्त्यांवर चालणारे भाविक, नवसाच्या बैलगाड्या , खाजगी वाहने, एस टी बसेस यामुळे मार्गावरील प्रवास कंटाळवाणा झाला नसल्याची प्रतिक्रिया भल्या पहाटे पिसर्वे येथून प्रवासाला निघालेल्या ज्योती आबासाहेब कोलते, अश्विनी दत्तात्रय अडसूळ, पुनम सचिन अडसूळ शारदा चंद्रकांत कोलते आदी महिलांनी दिल्या.



# लाडक्या लोकनेत्याला सहकार क्षेत्राचा सलाम



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरूर :** उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांना आदरांजली वाहण्यासाठी रविवार (ता.०१) शिरूर येथे शोकसभा पार पडली. शिरूरच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण महाराष्ट्राने एक कर्तबगार, दूरदृष्टी असलेला आणि जनतेसाठी अखंड झटणारा नेता गमावला असून शिरूरसाठी ही हानी असल्याची भावना शिरूर तालुका देखरेख संस्थेच्या गटसचिवाच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

'अजितदादा हे सहकार चळवळीशी जोडलेले होते. सहकारी साखर कारखाने, बँका, पतसंस्था, विविध कार्यकारी संस्था आणि कृषी आधारित सहकारी संस्थांमध्ये त्यांची भूमिका नेहमीच प्रभावी राहिली होती.विविध कार्यकारी संस्थेत काम करणाऱ्या सचिवांना दादांनी नेहमी योग्य न्याय दिला.सोसायटी सचिवाच्या वतीने आयोजित श्रद्धांजली सभेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

यावेळी शिरूर तालुका सचिव संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र पवार,सचिव कैलास लोहार, अनिल वाबळे, सुभाष सातकर, खंडू जगताप, सुखदेव खर्डे यांनी भावना व्यक्त करून आठवणींना उजाळा दिला. तसेच शिरूर तालुक्यातील विविध कार्यकारी संस्थेवर काम करणारे सर्व सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहीर आवाहन

सर्व लोकांना कळवण्यात येते की, दत्तात्रय किसन शिवले, मुक्काम पोस्ट चंद्रभागा निवास, भोंडवे वस्ती, वाल्हेकरवाडी, चिंचवडगाव, जि.पुणे ४११०३३ यांचे नुकतेच निधन झाले असून त्यांच्या नावावर असणारी वाहने नंबर

१) MH14EK2794
२) MH14GJ7429
३) MH14JU4443

असे असून सदर वाहने त्यांचे एकमेव कायदेशीर वारसदार पत्नी श्रीमती सारिका दत्तात्रय शिवले यांच्या नावावर सदर वाहने करण्यात येणार असून याबाबत कोणाची काही तक्रार असल्यास पंधरा दिवसाच्या आत पिंपरी चिंचवड आरटीओ कार्यालयात कळवावे अन्यथा कोणाची काही तक्रार नाही असे समजून पुढील पूर्तता करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दिनांक–०२/०२/२०२६
श्रीमती सारिका दत्तात्रय शिवले,
वसंत बहार नर्सरी जवळ, चंद्रभागा निवास, भोंडवे वस्ती, वाल्हेकरवाडी, चिंचवडगाव, जि.पुणे – ४११०३३

## विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी अहिल्यानगर पोलीस दल सज्ज

# ४ हजार मुलींना आत्मनिर्भरतेचा मंत्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** :विद्यार्थिनींना सुरक्षित,स्वाभिमानी आणि आत्मविश्वासाने जगता यावे यासाठी अहिल्यानगर जिल्हा पोलीस दल व जाणीव ट्रस्ट, वसई-विरार यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांमध्ये व्यापक जनजागृती व मार्गदर्शन अभियान यशस्वीपणे राबविण्यात आले. दि.२८ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत इयत्ता ७ वी ते ९ वी मधील विद्यार्थिनींसाठी आयोजित या उपक्रमातून सुमारे ४ हजार विद्यार्थिनींना थेट मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले.या उपक्रमात वक्ते मिलिंद पोखर




यांच्या माध्यमातून विद्यार्थिनींना समाजात आत्मनिर्भरतेने कसे उभे राहावे, आत्मविश्वास व स्वाभिमान जपून सुरक्षित जीवन कसे जगावे याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यासोबतच समाजातील संभाव्य धोके,सायबर गुन्हे,ऑनलाईन फसवणूक, सोशल मीडियावरील धोके यांची स्पष्ट माहिती देत प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणांद्वारे विद्यार्थिनींना सजग करण्यात आले.मार्गदर्शनादरम्यान एक अत्यंत महत्त्वाची आणि संवेदनशील बाब अधोरेखित करण्यात आली.

अनेक वेळा या वयोगटातील मुलींना ओळखीच्या, निकटवर्ती किंवा विश्वासातील व्यक्तींकडूनच त्रास सहन करावा लागतो. मात्र भीती, लाज किंवा जास्त विश्वासामुळे अशा घटना पुढे येत नाहीत. याबाबत विद्यार्थिनींना स्पष्टपणे सजग करण्यात आले.

या संवादातून काही विद्यार्थिनींनी स्वतःवर झालेल्या त्रासाबाबत मनमोकळेपणाने आपली व्यथा मांडली, ही या उपक्रमाची मोठी उपलब्धी ठरली. या सर्व प्रकरणांची गांभीर्याने दखल घेत अहिल्यानगर जिल्हा पोलीस दलाने संबंधित विद्यार्थिनींचा त्रास दूर करण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य व पुढील कायदेशीर कार्यवाही तत्काळ केली,हे विशेष उल्लेखनीय आहे. यामुळे विद्यार्थिनींमध्ये पोलिसांविषयी विश्वास अधिक दृढ झाला आहे.

## श्री व्यंकनाथ विद्यालयात बाल आनंदी बाजारचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या श्री व्यंकनाथ विद्यालयात नुकताच बाल आनंदी बाजारचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी व्यावहारिक ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी पालेभाज्या कांदा, मुळा, स्वीट होम चे पदार्थ तसेच वडापाव त्याबरोबरच काही घरगुती खाद्यपदार्थ या बाल आनंदी बाजारात विकण्यासाठी आणल्या होत्या. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साही वातावरणात या बाल आनंदी बाजारात खरेदी वक्री करताना आनंद द्विगुणित केला.



या बाल आनंदी बाजाराचे आयोजन विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब जठार यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यात आले. अनेक पालक हे शेतकरी असल्याने पुढे एखाद्या विद्यार्थ्याला शेती व्यवसायातून उत्पन्न कसे घ्यायचे, विक्री कशी करायची? त्यातून दोन पैसे कसे मिळवायचे? याबाबत विद्यार्थ्यांनी या बाल आनंद बाजारामध्ये स्वतःच्या शेतातील पिकविलेले अनेक विविध प्रकारचे भाजीपाले विक्रीसाठी शालेय परिसरात दिसून आल्या. विद्यालयाच्या या आनंदी बाजारामध्ये आठवडे बाजाराचे स्वरूप दिसून आले.

या बाजारामध्ये चिकू, पेरू, केळी इत्यादी मोठ्या प्रमाणात समावेश दिसून आला. अनेक पालकांनी या आनंदी बाजारात विद्यार्थ्यांनी आणलेले विविध प्रकारचे भाजीपाला, फ्रुट्स स्वीट होम खरेदी केले. निश्चितपणे विद्यार्थ्यांना या आनंदी बाजारातून एक वेगळाच आर्थिक दृष्ट्या अनुभव पहावयास मिळाला.

आपले आई-वडील शेतात कष्ट करून कुटुंबातील व्यक्तींना आर्थिक स्थैर्य प्राप्त होण्यासाठी धनधान्य, भाजीपाला पिकवतात. तो बाजारामध्ये नेतात. त्यातून कुटुंबाला मोठा आर्थिक फायदा होतो, याची प्रत्येक विद्यार्थ्यांना जाणीव देखील विद्यार्थ्यांना दिसून आली. विद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी देखील विद्यार्थ्यांनी या आनंदी बाजारात विक्रीसाठी आणलेले भाजीपाला स्वीट होम व अन्य प्रकारचे पदार्थ खरेदी केले. बाजारात भाजीपाला व अन्य पदार्थ विकताना किती कसरत होते. त्यातून किती? पैसे नफा होतो? हे देखील विद्यार्थ्यांना या आनंदी बाजारातून समजले. निश्चितच व्यंकनाथ विद्यालयाने आयोजित केलेला आनंदी बाजारातून एक विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान प्राप्त करून दिल्याचे दिसून आले.

## नगरपंचायत आरोग्य साधना उपक्रमाची नेवासा शहरात सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : संत रोहिदास महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून ''नगरपंचायत आरोग्य साधना'' हा उपक्रम नेवासा शहरातील नागरिकांसाठी सुरू करण्यात आला. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाच्या असणाऱ्या या उपक्रमामुळे रुग्णांची मोठी सोय होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांनी यावेळी बोलतांना दिली.

या उपक्रमाची अधिक माहिती देताना नगराध्यक्ष डॉ. घुले म्हणाले, असंसर्गजन्य आजाराचे रुग्ण हे आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष करतात आणि त्यामुळे हे आजार बळावतात हा आमचा गेल्या वीस वर्षाचा रुग्णसेवीतील अनुभव आहे. आर्थिक विवंचना, ज्येष्ठ नागरिक असणं, आणि आरोग्याबाबत दुर्लक्ष अशी या मागची कारणे आहेत. याचबरोबर प्रतिबंधात्मक उपाय करणे देखील शक्य होणार आहे. नगरसेवक प्रवीण सरोदे यांनी योजनेचे महत्त्व विशद करून संत रोहिदास महाराज जयंती निमित्ताने कार्यक्रम होत असल्याने समाधान व्यक्त केले. संतांचे उपदेश प्रत्यक्ष कृतीतून सादर करून लोकोपयोगी उपक्रम राबविण्याची रीत राज्यस्तरावर वाखाणली जाईल असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.वैद्यकीय अधिकारी डॉ सिद्दिकी शेख यांनी नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले. यावेळी संत रोहिदास महाराजांचे विचार कृतीतून उतरवण्याच्या या उपक्रमाचे समाजसेवक रवींद्र शेंडे यांनी कौतुक केले.

## संत रोहिदास महाराजांनी समाजाला माणुसकीची शिकवण दिली : सोमनाथ घार्गे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भुकेल्याला अन्न, तहानलेल्याला पाणी आणि माणसाशी माणुसकीने वागण्याची शिकवण संत रोहिदास महाराजांनी दिली असून त्यांचे विचार आजही समाजाला दिशादर्शक आहेत, असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. चर्मकार विकास संघ व लोकनेते माजी आमदार सिताराम घनदाट (मामा) सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने संत रोहिदास महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित समाजमेळावा व निशुल्क राज्यस्तरीय वधु-वर व पालक परिचय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

टिळक रोड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात 'जय संत रोहिदास'च्या घोषणांनी सभागृह दणाणून




गेले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर होते. प्रारंभी संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेस आरती व पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार व समाजातील दिवंगत ज्येष्ठांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

घार्गे म्हणाले, परोपकार हेच जीवनाचे खरे तत्त्वज्ञान असून देणारी माणसेच समाजाच्या स्मरणात राहतात. संतांनी साध्या शब्दांत जीवनाचे सार सांगितले असून त्या मार्गावर चालण्याची आजही गरज आहे. प्रा. माणिक विधाते यांनी योग्य वयात विवाह होणे गरजेचे असल्याचे सांगितले. संजय खामकर यांनी दरवर्षी होणाऱ्या निशुल्क वधु-वर मेळाव्यामुळे समाज एकत्र येत असून एजंटगिरीला आळा बसल्याचे नमूद केले.दिवसभर चाललेल्या या मेळाव्यास समाजबांधव व महिलांची मोठी उपस्थिती होती. यावेळी सामाजिक कार्याबद्दल प्रविण केदारे व बाबूराव चिंधे, तर पोलीस दलातील उत्कृष्ट सेवेसाठी राजेंद्र वाघ यांना समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष कानडे यांनी केले तर आभार सुभाष सोनवणे यांनी मानले.

## महिला बचतगटाच्या उत्पादनासाठी मॉल्स, धोरणात्मक निर्णयाचे स्वागत : स्नेहलता कोल्हे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : महिला सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता बचतगट ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात तयार करण्यात आले, त्यातून त्यांच्या छोट्या छोट्या उत्पादनांना चालना मिळाली या मालाच्या विक्री वृध्दीसाठी महिलांसाठी स्वतंत्र मॉल्स उभारण्याचा धोरणात्मक निर्णय अर्थसंकल्पात घेतला त्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी व अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे कौतुक करत या निर्णयाचे भाजपा नेत्या, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे यांनी स्वागत केले आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपण गेल्या काही वर्षापासून महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाचे विपणनांसाठी राज्यस्तरावर स्वतंत्र सुविधा निर्माण कराव्या अशी मागणी केली होती. त्याला या अर्थसंकल्पातून चालना देण्यांत आली ही मोठी बाब आहे. असे



स्नेहलताताई कोल्हे यांनी स्पष्ट करत मुलींच्या शिक्षणासाठी प्रत्येक जिल्हयांत स्वतंत्र वसतीगृह निर्माण केले जाणार आहे ही बाब निश्चीतच आहे. प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने आज महिला सर्वार्थाने पूढे येत आहे. ग्रामीण भागातील महिला स्वयंरोजगारातून स्वतःचे घर सावरून गांवच्या, तालुक्याच्या अर्थकारणाला दिशा देत आहे. कृषी, दुग्धपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, गृहउद्योग, सामुहीक शेती, सेंद्रिय उत्पादने, गो शेळीपालन आत आदी क्षेत्रात महिलाच सर्वार्थान पुढे आहे. त्यात प्रगती करत आहे. महिलाबचतगट ही त्यांची मोठी ताकद निर्माण झाली आहे.

आज महिला बचत गट जिल्हास्तरावर, तसेच महालक्ष्मी अशा माध्यमातून उत्पादनांची विक्री करू लागल्या आहे. महिलांनी उत्पादित केलेल्या मालाचे राज्य -देशस्तरावर विपणन व्हावे, आर्थीक समृध्दी यावी यासाठी धोरणात्मक पावले उचलावी अशी आपली सातत्याने मागणी होती ती या अर्थसंकल्पातून साकारली जात आहे याचे मनस्वी समाधान आहे. लखपती दीदी योजनेचेही व्याप्तीकरण वाढविले जात आहे, पर्यटन वृद्धीसाठी पर्यटन मार्गदर्शक म्हणून प्रशिक्षण देण्यात येणार आहे ही बाबही समाधानकारक आहे. आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी यंदाचा अर्थसंकल्प सर्वोत्तम असल्याचेही स्नेहलताताई कोल्हे यांनी शेवटी स्पष्ट केले आहे.

## शेवगाव येथे विश्वकर्मा जयंती उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : शेवगाव येथे सकल लोहार-सुतार समाजाच्या वतीने भगवान विश्वकर्मा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. शेवगाव येथील स्वराज मंगल कार्यालय येथे सकल लोहार -सुतार समाजाच्या वतीने शनिवारी ३१ रोजी सृष्टीचे रचनाकार भगवान विश्वकर्मा यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले होते. दीपप्रज्वलन व पुष्पहार घालून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विष्णू कौसे हे होते. सकाळी १० ते ११ ह.भ प. नंदकिशोर महाराज चव्हाण यांनी भगवान विश्वकर्मा यांचे चरित्र सांगताना भगवान विश्वकर्मा हे दैवी वास्तूकार असून सकल सृष्टीचा निर्माता रक्षक आणि रचनाकार असून ब्रह्मदेवाचे पुत्र असल्याचे सांगितले तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. प्रभाकर लाड यांनीतर विश्वकर्मीय समाज हा कष्टकरी



आणि कलाकुसरीत तरबेज असलेला समाज असल्याचे आपल्या भाषणातून म्हटले.

तसेच समाजाला मार्गदर्शन करताना पुणे येथील लोहार समाज अभ्यासक ज्ञानेश्वर थोरात यांनी समाजाने संघटित होऊन आपले प्रश्न सोडविले पाहिजे तसेच केवळ कारागिरीवर अवलंबून न राहता आपल्या मुलांना चांगले शिक्षण देऊन संस्कारीत करावे असे आवाहन केले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून महसूल अधिकारी राजेंद्र लाड, नवनाथ हराळे, शेवगावचे उपनगराध्यक्ष ताहेर पटेल, नगरसेवक संजय फडके , संतोष जाधव, प्रभाकर राऊत, भगवान राऊत आदींसह उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी आयोजक विजय म्हस्के, गोरक्षनाथ जवणे, अशोक दुधाने,रवींद्र लाड, संतोष डाखुरकर, नरेंद्र दुधलमल, कुमार कैसे, शुभम चाफेकर,अभय चव्हाण, यांनी परिश्रम घेतले सूत्रसंचालन प्रा. सुनील डाखुरकर यांनी केले महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## रामनाथ राजपुरे यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा बालमटाकळीत निषेध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : राजकारण आणि समाजकारण करत असताना गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीला कधी आम्ही थारा दिला नाही, कधी त्यांची संगत केली नाही, त्यामुळे म्हातारी मेल्याचे दुःख नाही परंतु आज काळ सोकत चालला असल्याने बालमटाकळी येथील दिवसेंदिवस वाढत चाललेल्या गुन्हेगारीला आळा बसणे गरजेचे आहे, आज माजी सभापती रामनाथ राजपुरे यांच्यावर जी वेळ आली आहे ती वेळ कोणावरही येऊ शकते, त्यामुळे अशा गुन्हेगारी प्रवृत्तीच्या तरुणांना वेळीच आळा बसणे आणि त्यांचा योग्य तो बंदोबस्त करणे ही गावासाठी आणि समाजासाठी काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद सदस्य मोहनराव देशमुख यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे यांच्यावर बोधेगाव येथील साईधाम जवळील राज हॉटेल समोर काही गुंड प्रवृत्तीच्या तरुणांनी गुरुवार दि. २९ रोजी भ्याड हल्ला केला असून या झालेल्या

> खंडणी किंवा टोळयांची दहशत यांसारखे गुन्हे पूर्वी मोठ्या शहरांमध्ये होत असत परंतु आता पोलीस प्रशासनाच्या निष्काळीपणामुळे त्याचे लोन आता बालमटाकळी सारख्या छोट्या गावापर्यंत पोहोचले आहे. हे जर मोडून काढायचे असेल तर सज्जन म्हणवून घेणाऱ्या लोकांनी एकत्र येऊन यांना धडा शिकविण्याची आज आवश्यकता आहे. कारण गेल्या शंभर वर्षाची या गावाला अखंड हरिनाम सप्ताहाची धार्मिक आणि सामाजिक परंपरा असून या गावात सर्व जाती धर्माचे लोक मोठ्या गुण्या गोविंदाने आणि एकोप्याने राहत आहे. परंतु अलीकडच्या काळात काही गुंड प्रवृत्तीच्या तरुणांना गावातीलच काही लोकांनी पाठबळ दिल्याने त्यांचे धाडस आणि मनोबल दिवसेंदिवस वाढत चालले आहे आणि त्यातूनच अशा धाडसी घटना घडत आहे.
>
> **मधुकर पाटेकर**
> **सामाजिक कार्यकर्ते, बालमटाकळी**

भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ रविवार दि. १ रोजी सर्व व्यापाऱ्यांनी गाव कडकडीत बंद करून ग्रामपंचायत कार्यालयासमोर निषेध सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित निषेध सभेत माजी जिल्हा परिषद सदस्य मोहनराव देशमुख हे बोलत होते. तसेच हा भ्याड हल्ला करणाऱ्या गुंड प्रवृत्तीच्या तरुणांना पोलिसांनी तात्काळ अटक न केल्यास लवकरच बालमटाकळी ठिकाणी तीव्र असा रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी लोकनियुक्त सरपंच डॉ. राम बामदळे, उपसरपंच सर्जेराव घोरपडे, शेवगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रामनाथ राजपुरे, ज्ञानेश्वर कारखान्याचे माजी संचालक मोहनराव देशमुख, भाजपाचे ज्येष्ठ नेते कासमभाई शेख, अल्पसंख्यांक सेलचे तालुकाध्यक्ष कमुभाई शेख, सेवा संस्थेचे संचालक रतनराव देशमुख, कुस्ती संघाचे तालुकाध्यक्ष पैलवान विक्रमराव बारवकर, माजी सरपंच भानुदास गलधर,




चंद्रकांत गरड, सेवा संस्थेचे माजी चेअरमन हरिश्चंद्र घाडगे, सुदामराव शिंदे, माणिकराव शिंदे, अशोकराव वाघुंबरे, सेवा संस्थेचे संचालक रोहिदास भोगले, सामाजिक कार्यकर्ते मधुकर पाटेकर, रायभन शिंदे, युसूफभाई शेख, बाळासाहेब दोडके, ग्रामपंचायत सदस्य विठ्ठल देशमुख, मगबूल शेख, बाबासाहेब वाघुंबरे यांच्यासह गावातील ग्रामस्थ, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### क्रांती चौकात संत रोहिदास महाराजांना अभिवादन

**अमरापुर** : चर्मकार समाजाचे आराध्य दैवत श्री संत रोहिदास महाराज यांच्या ६४९ व्या जयंतीनिमित्त चर्मकार विकास संघ, शेवगाव तालुक्याच्या वतीने रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी शहरातील क्रांती चौकात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

यावेळी संत रोहिदास महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार




अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास चर्मकार विकास संघाचे तालुका अध्यक्ष डॉ. संतोष कंगनकर, युवा अध्यक्ष दिनेश तेलोरे, जिल्हा युवा अध्यक्ष संजय गुजर, जिल्हा कार्याध्यक्ष गोरख शेठ वाघमारे, जिल्हा संघटक गणेश पवार, भाऊसाहेब भाग्यवंत, खजिनदार सातपुते, शेवाळे, भाऊसाहेब पाचरणे, शिवदास सरोदे अजय सरोदे, अजित सरोदे, डॉ. किशोर पाचरणे, डॉ. संजय बोरुडे, शुभम सोनवणे, अशोक आगवणे, दुर्गे, गणेश वाकचौरे, डॉ. जाधव, रामदास गाडेकर, लक्ष्मण ज्योतीक, दादासाहेब ज्योती, सुरज पोटे यांच्यासह सर्व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अजित दादांना स्वातंत्र्य सैनिक व ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने श्रद्धांजली

**अहिल्यानगर** : शहराशी विकासकामांच्या माध्यमातून स्वर्गीय अजितदादा पवार यांचे अतूट नाते होते. बुरुडगाव रोडवरील स्वातंत्र्य सैनिक एस. पी. देशपांडे व आनंद ज्येष्ठ नागरिक भवनाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी त्यांच्या नगर दौऱ्यातील आठवणींना उजाळा देण्यात आला.

नगर दौऱ्यावेळी अजितदादांनी विनायक नगर येथील ज्येष्ठ नागरिक भवनाला अनपेक्षित भेट देत ज्येष्ठांशी संवाद साधला होता. त्याच्या तब्येतीची विचारपूस करताना भवनातील सुविधांबाबत मार्गदर्शनही त्यांनी केले होते. माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी नगरच्या विकासकामांसाठी अजितदादांनी दिलेल्या भरीव निधीची आठवण करून दिली. कोरोनाकाळातही हॉस्पिटलसाठी ३० कोटींचा निधी मंजूर केल्याने सुसज्ज रुग्णालय उभे राहिले, असे त्यांनी सांगितले.




### उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना निमगाव वाघा येथे श्रद्धांजली

**अहिल्यानगर** : निमगाव वाघा (ता. नगर) येथे महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. गावाच्या वेशी जवळ आयोजित करण्यात आलेल्या या श्रद्धांजली कार्यक्रमात संपूर्ण परिसर शोकमग्न वातावरणात न्हाऊन निघाला होता.



निमगाव वाघा ग्रामस्थ, किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ तसेच धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून उपस्थितांनी मौन पाळत अभिवादन केले. या शोकसभेस ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे, पिंटू जाधव, अनिल डोंगरे, अण्णा जाधव, अनिल फलके, जालिंदर आतकर, गोरख निमसे, संजय कापसे, अरुण काळे, भाऊसाहेब कापसे, स्वामी शिवानंद, दत्ता लोखंडे, अनिल आनंदकर, दत्ता कापसे, भानुदास कापसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### बोरावके महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**श्रीरामपूर** : रयत शिक्षण संस्थेचे, रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय (स्वायत्त), श्रीरामपूर आणि श्री सद्गुरू गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स कॉलेज, कोपरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, ५ फेब्रुवारी २०२६ रोजी एक दिवसीय आंतरराष्ट्रीय ई-परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. २१ व्या शतकातील लोकशाही, समाज आणि मानवी वर्तन: भारतीय आणि जागतिक दृष्टिकोन हा या परिषदेचा मुख्य विषय असून, महाविद्यालयीन स्तरावर शैक्षणिक देवाणघेवाणीचा हा एक मोठा उपक्रम ठरणार आहे. सदर परिषद महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र, इतिहास आणि मानसशास्त्र या विभागांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेचे मुख्य बीजभाषक म्हणून थायलंडमधील सुवान सुनंदा राजभात विद्यापीठाचे प्रख्यात राजकीय विश्लेषक डॉ. श्रीरंजन आवटे मार्गदर्शन करणार आहेत.

### विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्त्व अष्टपैलू बनावे: पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे

**शेवगाव** : निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले .यावेळी प्रमुख अतिथी पोलीस निरीक्षक श्री संतोष मुटकुळे यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणा बरोबरच खेळ, सांस्कृतिक क्षेत्रात भाग घेऊन आपले व्यक्तिमत्व अष्टपैलू बनवावे असे मत व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन, दीप प्रज्वलन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आबासाहेब काकडे शैक्षणिक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री . लक्ष्मणराव बिटाळ होते. मंचावर प्रमुख पाहुणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संतोष मुटकुळे , माजी विद्यार्थी ओमकारनाथ पांगे,नगरसेवक अमरभैय्या पुरनाळे, संस्थेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व शाळेचे मुख्य समन्वयक पृथ्वीसिंग काकडे, ज्ञानेश्वर लबडे, संस्थेच्या मानव संसाधन प्रमुख अंजली चिंतामण, पत्रकार सुरेश पाटील, पत्रकार बुधवंत, प्रा. दत्तात्रय मोरे उपस्थित होते. वेगवेगळ्या परीक्षांमध्ये तसेच क्रीडा क्षेत्रात उत्तुंग यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा अध्यक्ष व प्रमुखपाहुण्यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. प्रास्ताविक अकॅडमीक कॉर्डिनेटर बाळू नीळ यांनी केले. यात त्यांनी कार्यक्रमाची थीम 'धैर्य व सशक्तीकरण' विषयी माहिती सांगितली.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री
सोमवार, दि.२ फेब्रुवारी २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# वांबोरीच्या भर बाजारपेठेत तीन ठिकाणी चोरी

## सहा जणांची टोळी कॅमेऱ्यात कैद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील मुख्य बाजारपेठेतील जैन श्वेतांबर मंदिरासह ज्वेलर्स दुकान व एका बंद घरावर चोरट्यांनी डल्ला मारून लाखोंचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली असल्याने चोरट्यांनी पुन्हा वांबोरी बाजारपेठेला लक्ष केल्याने बाजारपेठेत मोठी दहशत निर्माण झाली असून वांबोरीच्या सुरक्षेविषयी नागरिकांमधून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.घडलेल्या या घटनेत सहा चोरट्यांची टोळी सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून याप्रकरणी वांबोरी पोलीस दुरुक्षेत्रामध्ये गुन्हा नोंद करण्याचे काम सुरू होते. गेल्या काही महिन्यांपूर्वी सुभाष नगर येथील शंकरराव शेवाळे या निवृत्त शिक्षकाच्या घरी चोरी झाली होती तसेच महिन्याभरापूर्वी वांबोरी बाजारपेठेतही धाडसी चोरी झाली होती.

या चोरीचा तपास गुलदस्त्यात असतानाच पुन्हा एकदा शनिवारी पहाटे तीनच्या सुमारास वांबोरीच्या मुख्य बाजारपेठेत सहा जणांच्या चोरट्यांच्या टोळीने धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली असून यामध्ये जैन मंदिराच्या दरवाजाचा पितळी कोंडा कटरच्या साह्याने तोडून आतमध्ये प्रवेश करून सुमारे दीडशे किलो वजनाची दानपेटी मंदिरातुन बाहेर उचलून आणली. मोकळ्या जागेत तोडून तिच्यातील सुमारे ८० हजार रुपये रोकड लंपास केल्याचे पोलीस सुत्रांकडून समजले आहे.

त्यानंतर टोळीने वांबोरी मुख्य बाजारपेठेतील नीरज संतोष शर्मा यांचे शर्मा ज्वेलर्स या सोन्याच्या दुकानावर आपला मोर्चा वळवत शटरची कुलपे तोडून दुकानातील चांदीची पेंडल, नाणे, अंगठ्या ब्रेसलेट, चैन, पैंजण कर्णफुले व इतर चांदीचे दागिने अशी सुमारे एक किलो चांदीचे दागिने तसेच सोन्याच्या मुलामा असलेले एक ग्रॅम गोल्ड प्लेटींग तीन नेकलेस, सात अंगठ्या, असा सुमारे तीन लाखांचा ऐवज चोरट्याने चोरून नेला तर अनुज पंचारीया यांच्या बंद घराचे कुलूप तोडून आतमध्ये प्रवेश करून कपाटाची उचकापाचक केली परंतु तेथे चोरट्यांच्या हाती काही लागले नाही.

सदरील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांचे पथक त्याचबरोबर पोलीस उपनिरीक्षक चारुदत्त खोंडे यांच्यासह श्वान पथक, ठसे तज्ञ यांनी चोरांविषयी माहिती गोळा करत असून पोलीस हेड कॉ. झिने, पो. कॉ. सतीश कुऱ्हाडे, पो. ना. संतोष निकम आदींनी घटनास्थळी पाहणी केली असून ही घटना राहुरी पोलिसांनी गांभीर्याने घेऊन त्या दृष्टीने तपास सुरू केला आहे.

# चांधात मुरुम तस्करीवर महसूलची कारवाई



## जेसीबीसह डंपर ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : महसूल विभागाच्या पथकाने नेवासा तालुक्यातील चांदा-लोहारवाडी शिवारात होत असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन विरोधात धडक कारवाई करत एक जेसीबी सह एक डंपर ताब्यात घेतले आहे. महसूल पथकाच्या कारवाईची चाहूल लागताच इतर ट्रॅक्टर व डंपरने मुरूमासह 'स्पॉट' वरून पोबारा केला.

दरम्यान,चांदा व परिसरात कोटयावधी रुपयांचा हजारो ब्रास मुरुमाचे उत्खनन झाल्याचे आढळून आले. नेवासा तालुक्यातील चांदा शिवारात सर्रास होत असलेल्या अवैध मुरूम तस्करी बाबतचे फोटो, व्हिडिओ नेवासेचे उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांना गुप्त माहितीदाराकडून मिळाली. त्याची गांभीर्याने दखल घेत पाटील यांनी नेवासा तहसीलदार संजय बिरादार यांना कारवाईचे आदेश दिले असता तहसीलदार यांच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा मारून अवैध मुरूम उत्खनन करणारे एक जेसीबी सह एक डंपर ताब्यात घेतले.

जिल्हाधिकारी पंकज आशिया, अतिरिक्त जिल्हाधिकारी शैलेश हिंगे व उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या नेतृत्वाखाली नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे, सोनई मंडळ अधिकारी प्रशांत कांबळे, वडाळा मंडळाधिकारी सय्यद, नेवासा मंडलाधिकारी अनिल गव्हाणे,तलाठी गडकर, भावसार, कोतवाल योगेश मिसाळ, अमोल शिंदे, संदीप शिरसाठ, संतोष महाडिक यांच्या पथकाने ही कारवाई केली. दरम्यान, उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी कारवाई साठी पाठवलेल्या पथकाची माहिती संबंधित मुरूम तस्करांना महसुलाच्या स्थानिक' खबऱ्याकडून देण्यात आल्याची माहिती समोर आली.

तसेच प्रांतांकडे स्पॉटचे व्हिडिओ व फोटो आले असून उद्योग तीन-चार दिवस बंद ठेवा असा निरोपही या घरभेदीने तस्करांना दिला. दरम्यान, महसूल मधील तस्करांबरोबर 'अर्थपूर्ण' संबंध असणारी ही व्यक्ती कोण अशी चर्चा सध्या सुरू आहे.

### स्थानिक महसूल यंत्रणा करते काय?

थेट जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी यांना अवैध गौणखानिज तस्करीचे व्हिडिओ-फोटो जातात. त्यानंतर कारवाई होते. मात्र चांदा येथील स्थानिक महसूल यंत्रणा काय करते. त्यांनी खुले आम चालू असलेल्या या मुरूम तस्करीचे का कारवाई केली नाही. या सावलांबरीबरोबरच जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार या प्रकरणी त्यांच्यावर काय कारवाई करणार असे अनेक प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित होत आहेत.

> संबंधित कारवाईत एक जेसीबी व डंपर ताब्यात घेतले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच संबंधित मंडळाधिकारी व तलाठी यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार आहे. त्यांनतर पुढील कारवाई करण्यात येईल.
> **डॉ. संजय बिरादार, तहसीलदार, नेवासे**

# राज्यस्तरीय शालेय आष्टेडू आखाडा क्रीडा स्पर्धेत नेवासेच्या खेळाडूंचे यश

## ८ सुवर्ण, २ रजत तर १ कांस्य पदक पटकावले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : भंडारा (पवनी) येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय आष्टे डू आखाडा क्रीडा स्पर्धेत पुणे विभागाचे नेतृत्व करीत नेवासा येथील खेळाडू नी ८ सुवर्ण पदक, २ रजत पदक तर १ कांस्य पदके पटकावली. भंडारा (पवनी) येथील गांधी भवन या ठिकाणी स्पर्धा पार पडल्या .




या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय भंडारा व भंडारा जिल्हा आष्टे डू मर्दानी आखाडा असोसिएशन यांचे संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या . या स्पर्धेत पुणे, कोल्हापूर, लातूर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर मुंबई, नाशिक या विभागातील खेळाडूनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत नेवासा येथील उत्कर्षा आलवणे, निशा जाधव, सृष्टी वाल्हेकर, आयुष यादव, श्रीकांत काळे, आदित्य कडू, वीर शिंगी, विवेक बोस्टे, यांनी सुवर्ण पदक मिळविले. परम काळे, श्रेया चव्हाण यांनी रजत पदक मिळविले तर संग्राम काळे यांने कांस्य पदक मिळविले.

या खेळाडूंना मास्टर सुरेश लव्हाटे, प्रियांका राहिंज, यथार्थ लव्हाटे, आर्यन नायडू यांचे मार्गदर्शन लाभले. अहिल्यानगर आष्टे डू मर्दानी आखाडा असो.चे अध्यक्ष संजय सुखदान, राजेंद्र काळे यांच्यासह तालुक्यातुन अभिनंदन होत आहे.

# ३४ गुन्हेगार हद्दपार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**शिरसगाव** : सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जानेवारी २०२६ मध्ये श्रीरामपूर विभागातील ३४ जणांविरुद्ध हद्दपारीचा प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. आगामी सण व उत्सव आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात पोलीस दलाने गुन्हेगारी टोळ्या आणि सराईत गुन्हेगाराविरुद्ध झिरो टॉलरन्स धोरण स्वीकारले आहे. त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी सक्रिय गुन्हेगारावर प्रतिबंधक कारवाई करण्याचे निर्देश सर्व पोलीस स्टेशन यांना दिलेले आहेत.

त्याप्रमाणे अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाघचौरे यांनी माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२५ मध्ये श्रीरामपूर विभागातील अहिल्यानगर उत्तर जिल्हा १७ पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवरील मागील दहा वर्षातील सर्व गुन्हेगारांचा सविस्तर क्राइम डेटाबेस तयार केला आहे.त्यामधील सक्रिय व क्रियाशील गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यासाठी आणि प्रतिबंधात्मक कारवाईसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गुन्हेगाराचा मागोवा घेण्यासाठी या डाटाबेसचा खूप उपयोग होणार आहे. त्यामध्ये आरोपीचे वय गुन्ह्याचा प्रकार शरीराविरुद्धचे, मालमत्तेविरुद्धचे, अमली पदार्थ आणि त्यांच्या गुन्हे करण्याची पद्धत तसेच मागील दहा वर्षात किती आरोपी पुन्हा पुन्हा गुन्हे करत आहेत. याची स्वतंत्र यादी तयार करण्यात आली आहे त्यानुसार जे गुन्हेगार वारंवार गुन्हे करत आहेत आणि ज्यांच्यामुळे सार्वजनिक शांततेस धोका निर्माण होत आहे. अशा व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे सोयीस्कर झाले आहे.

जानेवारी २०२६ मध्ये याच मोहिमेअंतर्गत मानवी जीवितास किंवा मालमत्तेस भय ,इजा आणि धोका निर्माण करणाऱ्या किंवा तसा संभव असणाऱ्या व्यक्तींवर मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५, ५६ चे तरतुदीनुसार श्रीरामपूर शहर श्रीरामपूर तालुका, राहुरी, कोपरगाव शहर, कोपरगाव तालुका, शिर्डी, राहता, संगमनेर शहर, संगमनेर तालुका, अकोले, घारगाव, नेवासा, विभागातील एकूण ३४ व्यक्तींवर हद्दपारीचे प्रस्ताव अहिल्यानगर पोलीस अधीक्षक यांना अप्पर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर विभागाकडून, पाठविण्यात आले आहे. त्यामध्ये शरीर विरुद्धचे मालमत्तेविरुद्धचे, अमली पदार्थ इत्यादी प्रकारचे गुन्हे सदर आरोपींवर दाखल आहेत. तसेच अहिल्या नगर जिल्ह्यात गुन्हे करणाऱ्या व्यक्ती / टोळीचा बिमोड करण्यासाठी जिल्ह्यातील शरीराविरुद्धचे मालमत्तेविरुद्धचे , गोवंशीय कायद्यान्वये, भारतीय हत्यार कायद्यान्वये तसेच वाळू चोरीचे तसेच इतर गुन्हे करणाऱ्या सराईत गुन्हेगार इसमांची माहिती त्यांचे विरुद्ध हद्दपारीची कार्यवाही करण्यात येत आहे. अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांनी दिली. हे प्रस्ताव तयार करण्याचे काम वरील सर्व शहरातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक ,सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस कर्मचारी,यांनी केले आहे.

# पतीच्या अत्याचाराला कंटाळून महिलेची दोन मुलांसह आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री





**तळेगाव ढमढेरे** : पाबळ (ता. शिरूर) येथे पतीकडून वारंवार होणाऱ्या त्रासाला कंटाळून विवाहितेने आपल्या चार महिन्याच्या बाळासह दोन चिमूरड्यांना घेऊन विहिरीत आत्महत्या केल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे सदर महिलेच्या पतीवर गुन्हा दाखल करण्यात आला असून राजू पांडुरंग जाधव असे महिलेच्या पतीचे तर अहिला उर्फ भाग्यश्री राजू जाधव, सार्थक राजू जाधव व गौरी राजू जाधव असे तिघा मृतांची नावे आहे. एका वीट भट्टीवर कामासाठी असलेले अहिला उर्फ भाग्यश्री जाधव व राजू जाधव या दाम्पत्यांमध्ये वारंवार वाद होत असल्याने अहिला उर्फ भाग्यश्री ही पतीच्या त्रासाला कंटाळली होती, तर शिक्रापूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार काल व आज देखील या दांपत्यांमध्ये भांडण झाले होते, आज सकाळच्या सुमारास अहिला उर्फ भाग्यश्री ही तिच्या दोन्ही लहान मुलांना सोबत घेऊन सार्थकच्या सायकलसह घराबाहेर गेली होती.

दुपार पर्यंत भाग्यश्री घरी येत नसल्याने पती राजू याने तिचा आजूबाजूला शोध घेण्यास सुरुवात केली. त्यानंतर दुपारच्या सुमारास घरापासून काही अंतरावावर परमेश्वर पिंगळे यांच्या विहिरीच्या कडेला सार्थकची सायकल व भाग्यश्री सह मुलांच्या चपला दिसून आल्याने राजू याने आरडाओरडा करत स्थानिकांच्या मदतीने विहिरीमध्ये शोध सुरू केला, घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक धनंजय थेऊरकर, पोलीस शिपाई विशाल देशमुख, गणेश येळवंडे यांसह आदींनी घटनास्थळी धाव घेत नागरिकांच्या मदतीने विहिरीमधील महिलेसह तिच्या दोन चिमूरड्यांचे मृतदेह बाहेर काढले.

सदर घटनेमध्ये अहिला उर्फ भाग्यश्री राजू जाधव (वय ३० वर्षे), सार्थक राजू जाधव (वय ६ वर्षे) व गौरी राजू जाधव (वय चार महिने)(तिघे सध्या रा. पाबळ ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. बीबी ता. लोणार जि. बुलढाणा) या तिघांचा मृत्यू झाला. तर घडलेल्या घटनेबाबत मयत भाग्यश्रीची बहीण जयश्री सुनील जाधव (वय ३५ वर्षे सध्या रा. एकेरी माळ पाबळ ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. खडकी ता. सेनगाव जि. हिंगोली) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी राजू पांडुरंग जाधव (वय ३२ वर्षे सध्या रा. एकेरी माळ पाबळ ता. शिरूर जि. पुणे मूळ रा. खडकी ता. सेनगाव जि. हिंगोली) याच्याविरुद्ध महिलेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याबाबत गुन्हा दाखल करत त्याला अटक केली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे करत आहे.

# माणुसकीचे दर्शन

## पोलिसांनी मनोरुग्णास सोपवले कुटुंबाच्या ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**बेलापूर** : कसलीही ओळख अथवा माहिती उपलब्ध नसताना एका मनोरुण व्यक्तीचा अथक शोध घेऊन त्याला कुटुंबाच्या ताब्यात देण्याचे माणुसकीपूर्ण कार्य बेलापूर पोलिसांनी केले. मनोरुग्ण मुलाला पाहताच आई व भावाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. पोलीसातील माणूस आजही जिवंत आहे, अशा भावना व्यक्त करत आई अलका ससाणे यांनी बेलापूर पोलिसांचे आभार मानले. वाहेगाव (ता. पैठण, जि. संभाजीनगर) येथील सोमनाथ नंदकुमार ससाणे (वय ४५) हा मनोरुग्ण असून, तो घरातून निघून भटकत भटकत उक्कलगाव येथे पोहोचला. शिंदे वस्ती परिसरात तो आरडाओरड करत असल्याचे लक्षात येताच अशोक शिंदे, शुभम शिंदे, वैभव शिंदे व प्रमोद शिंदे यांनी युवा नेतृत्व युवराज थोरात यांना माहिती दिली. युवराज थोरात, पोलीस पाटील हिराबाई मोरे, इंद्रजित मुसमाडे, मुकेश जगधने, दीपक पवार व सोन्या खेमनर यांनी घटनास्थळी धाव घेतली. सुरुवातीला चोर असावा असा संशय होता; मात्र तो निरर्थक बडबड करत असल्याचे स्पष्ट झाले. याबाबत बेलापूर पोलीस ठाण्यातील कॉन्स्टेबल संपत बडे यांना माहिती देण्यात आली. बडे यांनी तातडीने घटनास्थळी येऊन तपास केला. संबंधित व्यक्तीच्या खिशात कोणतीही ओळख सापडली नाही. तो फक्त 'ससाणे' एवढेच नाव सांगत होता. गृहरक्षक दलाचे महेश थोरात, रणजीत थोरात व हर्षल इंगळे यांच्या मदतीने त्याला बेलापूर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याची नीट काळजी घेत नाश्ता देण्यात आला. पुन्हा तपासणीदरम्यान खिशात एक लहान कागद सापडला. त्यावरील नंबरवर संपर्क साधल्यानंतर अखेर संबंधित व्यक्तीची ओळख पटली. तो मनोरुग्ण असल्याची खात्री झाल्यावर पोलिसांनी त्याचा भाऊ योगेश व आई अलका ससाणे यांच्याशी संपर्क साधला. पहाटे दोन वाजता आई व भाऊ पोलीस ठाण्यात आले आणि सोमनाथला ताब्यात घेतले. मुलाला सुखरूप मिळाल्याने ससाणे कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांच्या आनंदाश्रूंनी पोलीस कॉन्स्टेबल संपत बडे व गृहरक्षक दलाचे जवानही गहिवरले. बेलापूर पोलिसांच्या या कर्तव्यदक्ष व माणुसकीपूर्ण कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पाच वर्षांपासून बंद शिवरस्ता पालकमंत्र्यांच्या आदेशानुसार खुला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगांव** : माळवाडगांव शिवारातील उत्तरेस शेतीमहामंडळ जमिनी लगतच्या माळेवाडी रस्ता ते हुरूळे वस्ती पर्यंतच्या शिव रस्त्यापैकी गट नं.८१ बांधापर्यंतचा वहिवाटीचा रस्ता अप्पर आयुक्त नाशिक यांच्या आदेशानुसार तहसिलदार महसूल व हरिगांव मळा शेतीमहामंडळ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत खुला करण्यात आला.

माळवाडगांव शिवार व शेतीमहामंडळ दरम्यान भूमी अभिलेख नकाशात हरिगांव शिव असा उल्लेख असतानाही २०२१ मध्ये करारदार स्थानिक शेतकऱ्यानी आठवाडी बी ब्लॉक मधील शेती ग्रुपमध्ये संगमनेर तालुक्यातील खुळे यांच्या नावे घेतली. मात्र या स्थानिक शेतकऱ्यानी काटवनातील जमिन दुरूस्ती करताना शिवरस्ता व पाटपाणी चारी नामशेष करून शेतकऱ्यांचे रस्त्यासह पाटपाणीही बंद केले. या शेतकऱ्यापैकी भाऊसाहेब शामरांव मुठे यांची कोंडी होऊन वस्ती वरून बाहेर वहिवाटीसाठी पाउलवाट देखील राहिली नाही. म्हणून भाऊसाहेब शामराव मुठे यांनी १२ शेतकऱ्यांसह तहसिलदार श्रीरामपूर यांच्या दालनात केस नं. २१३/२०२१ दाखल केली. त्यावेळचे तहसिलदार प्रशांत पाटील यांनी स्थळ निरीक्षण करून गट नं ८१ मध्ये जाण्यासाठी शेती महामंडळाच्या हद्दीतून भाऊसाहेब शामराव मुठे यांना रस्ता खुला करून देण्याचा आदेश दिला.



रस्ता खुला करून देण्यासाठी यंत्रणा सज्ज झालेली असताना महामंडळाकडून प्रांताधिकारी यांचेकडे अपील करण्यात आले. पुढे प्रांताधिकारी यांनी जैसे थे निकाल दिल्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी यांनीही जैसे थे निकाल दिल्यानंतर पुन्हा अप्पर आयुक्त नाशिक यांचेकडे अपील करण्यात आले.हा अपिलीय सिलसिला तब्बल पाच वर्ष सुरू असताना मुठे कुटुंबिय हतबल झाले होते.

यात शेतीमहामंडळाची ढाल पुढे करून करारदार शेतकरी अपिल करण्यासाठी भाग पडत असल्याचे निदर्शनास आले. अखेर भाऊसाहेब शामराव मुठे यांनी माळवाडगांव सोसायटीचे चेअरमन गिरीधर आसने यांच्या सहकार्याने पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात विखे पाटील यांच्या शासकीय निवासस्थानी भेट घेतली.या रस्ता केस संदर्भातील सविस्तर कैफियत महसूल मंत्री महोदयासमोर मांडली.त्याचक्षणी महसूल मंत्री महोदयांनी शेतीमहामंडळ कार्यकारी संचालक पुणे,व नाशिक अप्पर आयुक्त अजय मोरे यांना रस्ता खुला करून देण्याचे आदेश दिले होते.

अप्पर आयुक्त अजय मोरे यांनी निकाल दिल्यानंतर श्रीरामपूर तहसीलदार मिलिंद वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मंडलाधिकारी श्रीमती रोहिणी आघाव, माळवाडगांवचे ग्राममहसुल अधिकारी दिपक साळवे, महसूल सहाय्यक बाळासाहेब वायदंडे, भाऊसाहेब मुठे,मनिष शिंदे शेतीमहामंळ हरिगांव मळा स्थावर व्यवस्थापक पिरमहंमद शेख ,कार्यालय अधीक्षक चंद्रकांत येरूळे सहकारी स्टाफ उपस्थित होता.

> महसूल नव्या अध्यादेशानुसार ऊस गहू हार्वेस्टिंग मशिनसाठी १२ फुट रस्ता देणे बंधनकारक असतानाही, स्थावर व्यवस्थापक यांनी अगोदर फक्त बैलगाडी चाकरी म्हणजे ८ फुट रस्ता आखणी खुणा करून देण्याचा निर्णय घेतला असता उपस्थित अन्य शेतकऱ्यांनी नवीन महसूल जी आर नुसार १२ फुट रस्त्यांची विनंती करूनही मान्य न करता १० फुट मान्य केले.शिवाय रस्ताकडेला जेसीबीने नाली घेण्यासही मज्जाव केला. ज्यामुळे शेतकरी मुठे कुटुंबास पाच वर्षांपासून साधी पाऊल वाट नव्हती. मात्र केस मधील गट नं.८१ पुढील हुरूळे वस्तीबाजूचे अन्य १२ शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुन्हा पुढील अपूर्ण रस्ता खुला करून देण्यासाठी रस्ता केस टाकण्याचा निर्णय घेतला.